जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


**वर्ष ६२ वे )** **किंमत १ रुपया** **( अंक १०**

श्रीसाईलीला जानेवारी १९८४

दूरध्वनी
८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

ओम नमो सद्गुरुराया ।
चराचराच्या विसाविया ।
अधिष्ठान विश्वा अवधिया ।
असशी सदया तूं एक ॥४५॥
पृथ्वी सप्तद्वीप नवखंड ।
सप्तस्वर्ग पाताळ अखंड ।
यातें प्रसवी जे हिरण्यगर्भांड ।
तेंचि ब्रम्हांड प्रसिद्ध ॥४६॥
प्रसवे जी ब्रम्हांडा यया ।
जी नामें 'अव्यक्त वा माया'
तया मायेचियाही पैल ठाया ।
सद्गुरुराया निजवसती ॥४७॥
तयाचें वानावया महिमान ।
वेदशास्त्री धरिलें मौन ।
युक्तिजुक्तीचें प्रमाण ।
तेथें जाण चालेना ॥४८॥
ज्या ज्या वुज्या तुजउपमावें ।
तो तो आहेस तूंचि स्वभावें ।
जें जें काहीं दृष्टि पडावें ।
तें तें नटावें त्वां स्वयें ॥४९॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय १ ला.

# नूतन वर्षाभिनंदन

ख्रिस्ती शताब्दाप्रमाणें
सुरू होणारे हे नूतन वर्ष
आमच्या सर्व वाचकांना
समस्त साई भक्तांना
लेखक-कवी आणि
हितचिंतकांना
सुखाचे, समृद्धीचे
उत्कर्षाचे आणि
भरभराटीचे जावो


—संपादक

# अनुक्रमणिका जानेवारी १९८४


(१) संपादकीय — भाव तसा देव
(२) संत श्रीदासगणू महाराज — सदानंद चेंदवणकर
(३) सापटणेकर कुटुंब — श्री. मु. ब. निंबाळकर
(४) मला दिसलेले दासगणू — सौ. नंदिनी नाडकर
(५) ...आणि श्रीसाईबाबा प्रत्यक्ष रंगमंचावर! — श्री. मनोहर सावंत
(६) अल्लामालिकचा अर्थ — प्रा. र. श्री. पुजारी
(७) बाबांची आज्ञा — श्री. बाळकृष्ण देसाई.
(८) माझिया भक्तांचे धामी — सौ. रेखा माहिमकर
(९) ममा (श्रीसाई कथा) — श्री. ग. रा. पालकर
(१०) कल्पवृक्षाचे छायेत — श्री. वसंत प्रधान
(११) श्रीसाई समर्थ — श्री. अरविंद बारटक्के
(१२) श्रद्धा हेच जीवन — श्री. सुरेश कुलकर्णी
(१३) साईनाथा तुझी सेवा सतत घडो — श्री. मधुसूदन करंबेळकर.
(१४) दिव्यानुभूती — सौ. सीता कुलकर्णी
(१५) मशीदमाई–द्वारकामाई–मुरलीधर मंदिर— श्री. पु. कृ. धुपकर.
(१६) जीवनाची सार्थकता — श्री. सूर्यकांत गर्जे
(१७) संतरत्न भालचंद्र महाराज — श्री. गौरूराम उरणकर
(१८) नववर्षाचे स्वागत — श्री. चंद्रकांत गरगटे
(१९) दासगणूंचे साईनाथ — सौ. सरोजिनी मुळ्ये
(२०) साई कृपाळू — श्री. शांताराम श्रीद

# भाव तसा देव

स न वि वि




'भाव तसा देव' हे वाक्य आपल्या नेहमी जिभेवर खेळत असते परंतु ते अंतर्यामापर्यंत मात्र सहसा जाऊन पोचत नाही. जशी आपण भावना बाळगावी तसे त्याचे फळ पदरात पडते. या ठिकाणी भाव हा शब्द श्रद्धा अर्थाने वापरण्यात आलेला आहे. जशी तुमची श्रद्धा असेल, तसे तुम्ही होता, परंतु मनुष्याने श्रद्धेचा आश्रय हा केलाच पाहिजे. जेथे श्रद्धा नाही तेथे आस्था नाही, तळमळ नाही आणि जेथे तळमळ नाही तेथे काहीच नाही, काहींच नाही.

आपल्यापैकी पुष्कळांचे जीवन श्रद्धाहीन असते. आयुष्य कसे तरी ढकला-वयाचे हा असतो त्यांचा निर्माल्यवत जीवनक्रम. त्यात जीवंतपणा किंवा चैतन्य मुळीच नसते. त्या जीवनाला का मानवी जीवन म्हणावयाचे? तुम्ही काही करा, कोणतेही कार्य हाती घ्या, त्याच्या पाठीमागे श्रद्धेचे पाठबळ हे असलेच पाहिजे. ज्या प्रमाणात ते पाठबळ असेल त्या प्रमाणात तुम्ही यश संपादन करू शकाल.

'भाव तसा देव' तुम्ही आपल्या हाती घेतलेल्या कार्यात धवघवीत यश मिळविणे हा एक दैवी चमत्कारच आहे. तो चमत्कार तुम्ही श्रद्धेच्या बळावर पार पाडून दाखवू शकता. ज्याची जशी श्रद्धा असेल तसे त्याला फळ मिळते. सध्या रोजच्या व्यवहारात याचा अनुभव आपण घेत आहोत. बाबा म्हणतात "तुम्ही कोणी कुठेही असा, भावे मजपुढे पसरिता पसा । मी तुमचि या भावा सरिखा रात्रंदिवस उभाच॥"

स्थळाचा काळाचा वा व्यक्तीचा येथे संबंध नाही. कोणत्याही देशाच्या कोणत्याही भागात तुम्ही असा, तुम्ही कोणत्याही समाजाचे घटक असा, तुम्ही जे काही कराल जे जे हाती घ्याल ते ते माझ्या आठवणीने माझ्यावर संपूर्ण

भाव ठेऊन करा, एवढे केलेत म्हणजे तुमच्या पुढील यशाची चिंता वहाणारा मी आहे असे श्री साईबाबा म्हणतात.

ते पुढे म्हणतात, तुमच्याकडून अपेक्षा आहे ती श्रद्धेची. ती श्रद्धा वर वरची नको. ती अंतःकरणापासून जन्माला आलेली पाहिजे. तेवढे लेणे तुम्ही घातलेत मग मी तुमच्यापासून दूर नाही. मग माझे घर तुमच्या अंतःकरणातच आहे म्हणून समजा मग मी आणि तुम्ही वेगळे नाहीं. श्रद्धेच्या बळावर एवढी एकतानता साधता आल्यावर या जगात तुम्हांला काय उणे पडणार आहे? माझ्या अस्तित्वाची जाणीव झाल्यावर मग तुम्हांला उणीव कसली भासणार आहे?

'भाव तसा देव' असे आहे श्रद्धेचे महत्त्व. आजवर होऊन गेलेल्या साधु-संतांनी आपणास हेच सांगितले आहे 'भाव धरा रे । अपुलासा देव करारे॥' तुम्हाला देव हवा आहे? तुम्हाला देवाच्या ठायी असलेले उच्च गुण प्राप्त करून घ्यावयाचे आहेत? तुम्हांला देवत्व मिळवावयाचे आहे? मग भावाला गच्च मिठी मारा. कशावर तरी बळकट श्रद्धा ठेवा. कितीही संकटे आली तरी श्रद्धेची नाव तुम्हांला यशस्वी रीतीने पैलतीराला घेऊन जाईल हे निश्चित समजा.

बाबांनी तुमची श्रद्धा कशावर आहे हे पाहिले नाही. तुमच्या ठायी जिवंत रसरशीत श्रद्धा आहे की नाही हेच पाहिले व आजही ते याच दृष्टीने पहात आहेत. तुमची श्रद्धा साई सच्चरित्रावर आहे-की गुरु चरित्रावर आहे हे त्यांनी पाहिले नाहीं. या गोष्टीला त्यांनी महत्त्व दिलेले नाहीं. त्यांनी महत्त्व दिले आहे ते जातीवंत जीवंत श्रद्धेला.

कोणास अध्यात्म रामायण । कोणास ज्ञानेश्वरी पुरश्चरण कोणास हरि-वरदा पारायण । गुरुचरित्रावलोकन कोणाते ॥ कोणा बसविती पाया जवळी । कोणास खंडोबाच्या देऊळी । कोणाच्या विष्णू सहस्त्रनामावळी । बांधिती गळी कळवळीने ॥

किती व्यापक व सर्वव्यापी क्षेत्र आहे हे! प्रत्येकाची आवड निवड काही सारखी नसते. व्यक्ति तितक्या प्रकृती! कोणाला काय आवडते तर कोणाला

काय आवडते! परंतु आपली आवड निवड भिन्न व वेगवेगळ्या आहेत, त्या असेनात का, त्या सर्वांना व्यापून रहाणारा सर्वनाच एकाच सूत्रात गोवणारा व जरूर त्या राजमार्गावर आणून सोडणारा एक महत्तम गुण जाग्यावर असला म्हणजे झाले आणि तो महान गुण म्हणजेच भाव किंवा श्रद्धा. तुम्हांला आम्हांला सर्वांनाच देवत्वाप्रत घेऊन जाणारी खात्रीची व सर्वश्रेष्ठ शिडी म्हणजेच श्रद्धाच होय.

सध्या श्री साईबाबांच्या संबंधीचा भक्तिभाव उत्तरोत्तर जिकडे तिकडे हवा तसा वाढतच चाललेला आहे. त्यांच्या संबंधी कुठे काहीही असो, त्याकडे सहाजिकच भक्तगण मोठ्या प्रमाणात आकर्षिला जातो. त्यामुळे कित्येक भक्तिभाव मनात नसलेल्या लोकांना आपला स्वार्थ साधण्यास वहात्या गंगेत हात धुवून घेण्यास उत्तम संधि आहे असे वाटते. त्यांच्या नावाचा फायदा मिळविण्यासाठी काहींना काही हालचाली नेहमी चाललेल्या असतात. कोणी 'साई दरबार' उभारतात तर कुणी साक्षात द्वारकामाई उभी करतात तर मंदिरे उभारून शिरडीतील श्री बाबांच्या समाधी स्थानाची अगदी हुबेहुब नक्कल करतात. अशा या प्रयत्नांशी श्री साईबाबांच्या शिरडी संस्थानचा कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो. श्री बाबांच्या किंवा द्वारकामाईच्या नावाने कुणी काही करू लागला तर कोण कुणाचा हात धरू शकणार! परंतु वृथा कुणाही भक्ताचा गैरसमज होऊ नये व बाबांच्या शिरडी संस्थानचा अशा प्रकारांशी, संबंध आहे असे उगाच कुणाला वाटू नये म्हणून हे पण या 'भाव तसा देव या बरोबरच खुलासेवार प्रगट चिंतन करीत आहोत.

जयंती निमित्त खास लेख

# ह. भ. प. दासगणू महाराज

—सदानंद चेंदवणकर

० श्रीसंत दासगणूमहाराज हे श्रीसाईबाबांचे समकालीन. ते साईबाबांचे एक थोर भक्त होऊन गेले. आधुनिक महिपती म्हणून त्यांची कीर्ती महाराष्ट्रभर दरवळत आहे. त्यांचे खरेखुरे नाव गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे. त्यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यातील कोनवडे गावचे राहाणारे. त्यांचे घराणे सुखवस्तू. गोत्र शांडिल्य, अश्वलायन सूत्र, ऋग्वेदी चित्तपावन ब्राम्हण. आईचे नाव सावित्रीबाई होते.

दासगणूंचा जन्म शके १७८९ मध्ये पौष शुद्ध एकादशीच्या पुण्यदिवशी इ. सन १८६७ साली अकोळनेर येथे झाला. अकोळनेरचे आप्पाजी रामचंद्र जहागीरदार हे त्यांचे मातामह. मातृकुल ईश्वरनिष्ठ असल्याने या संस्काराचा वारसा श्रीदासगणूंना पूर्णपणे प्राप्त झाला खरा, पण वयाच्या तिशीपर्यंत तो सुप्त होता.

श्रीदासगणूंचा जन्म सूर्योदयाचे सुमारास झाला. म्हणून त्यांचे पाळण्यातील नाव नारायण असे ठेवले गेले. त्यांची आई या नारायणाला घेऊन जेव्हां आपल्या पतिगृही परत आली, त्यावेळी आजोबा श्रीएकनाथपंतांनी आपल्या गुटगुटीत नातवास मोठ्या प्रेमाने मांडीवर घेतले व नातवास पाहून ते म्हणाले, "नारायण नाव काय ठेवलेस? या गुलामाचे पोट कसे गणपतीसारखे आहे. याचे कानसुद्धा पहा कसे मोठे आहेत. तेव्हा याला आपण गणपतीच म्हणू या."

आजोबांची ही सूचना सर्वांनाच एकदम मान्य झाली व नारायण हे नाव मागे पडून गणपती, गणेश हेच नाव प्रचारात आले.

शके १७९८ मध्ये त्यांची वयाच्या नवव्या वर्षी मुंज झाली. लहान असताना दासगणूंना विद्याभ्यासात गोडी वाटेना. त्यांच्या वडिलांना पण विविध व्यवसायांमुळे मुलाकडे लक्ष देण्यास फारशी सवड झाली नाहीं. त्यांचे चुलते जनार्दनपंत, मामलेदार असल्याने ते बहुतेक फिरतीवर असत. म्हणून आपल्या पुतण्याला श्री. रघुनाथ बळवंत लिमये यांच्याकडे त्यांनी सोपविले. ते गृहस्थ फार कडक, छडीशिवाय बोलतच नसत, त्यामुळे उनाडक्या करणाऱ्या छोट्या दासगणूंवर त्यांच्या कडकपणाचा उलटा परिणाम झाला.

पुढे जनार्दनपंतांनी इ. स. १८८८ ते १८८९ या काळात संगमनेरला ठकार नावाच्या पदवी परीक्षेपर्यंतचा अभ्यास केलेल्या गृहस्थांच्या हवाली दासगणूंना केले. ते शिक्षक होते. पण दासगणूंचे तिथेही जमेना. अभ्यासात त्यांचे मन रमेना. रात्रीच्या वेळी ते तमाशास जात. गोंधळी, तमासगीर, यांच्याशी त्यांची सलगी वाढली. लावण्या, पोवाडे इ. ग्राम्य गीतांशी त्यांचा परिचय वाढला. अनंत फंदी, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, होनाजीबाळा यांच्यासारखी लावण्या, पोवाडे, छक्कड, फटके इ. ची रचना आपणही करावी, अशी आकांक्षा त्यांच्यात निर्माण झाली; व अभ्यासाच्या टिपणाऐवजी लावण्या-छक्कड यांचीच रचना ते करू लागले.

इंग्रजी चौथीत असतानाच दासगणूंनी शाळेला व शिक्षणाला रामराम ठोकला व ते आपल्या मावशीचे यजमान श्री. बळवंत सदाशिव गोडबोले यांच्याकडे बडोद्यास गेले. श्री. गोडबोले मुन्सफ होते. तिथे त्यांनी आपल्या भाच्याला एका खाजगी खात्यात लहानशी नोकरी मिळवून दिली. पण त्या कामाचा त्यांना कंटाळा आला. त्यांनी नोकरी सोडली व ते पुन्हा नगरला आले. शके १८१३ मध्ये जामखेड तालुक्यातील बोरले-अष्टयाचे जहागीरदार नारायणराव रानडे यांच्या कन्येशी श्रीदासगणूंचा विवाह पुण्यास झाला. लग्नानंतर मुलगा वळणावर येईल अशी सर्वांची कल्पना होती, पण काही एक न करता चकाटच्या पिटीत ते गावामधून हिंडत व दिवसभराचा वेळ घालवीत. यामुळे घरात त्यांचे सारखे खटके उडू लागले.

एकदा चुलती त्यांना टोचून बोलली व त्यासरशी दासगणू जे घराबाहेर पडले ते कायमचेच.

आपले एक स्नेही श्री. विश्वनाथपंत निसळ यांचे घरी ते काही दिवस राहिले. पण असेच एकदा नगरच्या रस्त्यावरून हिंडत असताना पोलिस सुपरिटेंडेंट एम. केनेडी हे युरोपियन गृहस्थ घोड्यावरून येत असताना त्यांची व दासगणूंची गाठ पडली व त्यांनी त्यांना श्रीगोंदे येथे दरमहा ९ रुपये पगारावर शिपाई म्हणून नोकरीस ठेवले. श्रीगोंदे, जामखेड, खर्डी, नगर, नेवासे या गावी त्यांनी एकूण ११ वर्षे नोकरी केली.

श्रीदासगणू प्रथम कट्टर शिवभक्त होते. सोमवार, प्रदोष, शिवरात्र ही व्रते ते मोठ्या निष्ठेने कडकडीत पाळीत. महाशिवरात्रीला निर्जळा व्रताचे

शिवलिंगावर रुद्राचा अभिषेक करीत. पंढरपूरचे ते वारकरी होते. गोदावरी बद्दल त्यांना अपरंपार प्रेम होते. महान भगवद्भक्त श्रीसद्गुरु वामनशास्त्री इस्लामपूरकर हे दासगणूंचे गुरु होत. आपल्या या सद्गुरुंचा उपदेश झाल्यावरच, दासगणू हे दासगणूमहाराज या नात्याने प्रसिद्धीला आले. सद्गुरुंचा दास असा गणू किंवा गणू हा सद्गुरुंचा दास या भावनेने महाराज आपल्या काव्यामध्ये स्वतःचा उल्लेख दासगणू किंवा गणूदास अशा प्रकारे करू लागले. आपल्या नोकरीत असताना केलेल्या काव्यातून –

**गणूदास रची हे कवनकथा सुंदर ।**
**वामनशास्त्रींचा हस्त मस्तकावर ॥**

अशा अर्थाचे अनेक उल्लेख आहेत.

श्री सद्गुरुंच्या आदेशानुसार दासगणू शिरडीला गेले. सदाचारसंपन्न वामनशास्त्रींनी त्यांना आपण काशीस समाधिस्थ होण्यापूर्वी सांगितले होते.

"शिरडीचे श्रीसाईबाबा सुयोग्य विभूती आहेत. त्यांना तू माझेच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोत. तेच तुला आता येथून वेळोवेळी मार्ग दाखवतील."

या आदेशानुसार श्रीदासगणूंनी श्रीसाईबाबांना उद्देशून पुढीलप्रमाणे प्रार्थना केली :

**हे श्रीसाई समर्था । तुझ्यापदी ठेवून माथा ।**
**करितो विनंती हीच आता । ती उदारपणे मान्य करा ॥**
**मी सकल संतांचा चरणरज । माझी राखा आपण लाज ।**
**तुम्ही भवाब्धीचे जहाज । हे म्या पक्के जाणले ॥**
**हीच विनंती, साईनाथा । या वामनशास्त्रांच्या छात्रा ।**
**नका लोटू कदा परता । बाबा, दासगणूसी ॥**
**माझे गुरु मरून गेले । पोरकेपण मजला आले ।**
**म्हणून पाहिजे सांभाळिले । या पोरक्या गणूसी ॥**
**तुम्ही एकरूप अवघे संत । तुम्हां माजी नसे द्वैत ।**
**तुम्ही वामनशास्त्री साक्षात् । आहात, बाप, मजलागी ॥**

**भक्तिसारामृत** ५३–२९२

श्रीदासगणूंची निष्ठा श्रीसाईबाबांच्या चरणी स्थिरावली. आपले स्नेही श्री. नानासाहेब चांदोरकर यांच्याबरोबर १८९६ साली प्रथम दासगणू शिरडीला श्रीसाईंच्या दर्शनाकरिता गेले. त्यांच्या बाबांच्या वरील निष्ठेतूनच त्यांना पुढील अभंग स्फुरला.

**शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर ॥**
**शुद्धभक्ति चंद्रभागा । भाव पुंडलिक जागा ॥**
**याहो याहो अवघे जन । करा बाबांसी वंदन ॥**
**गणू म्हणे, बाबा साई । धाव पाव, माझे आई ॥**

श्रीसाईबाबांचे दासगणूंच्यावर भारी प्रेम होते. अनेकांच्यावर बाबा कधी कधी खूप रागावत, शिव्या देत, मारहाण देखील करीत, पण दासगणूंवर ते रागावल्याचे कुणी कधी पाहिले नाहीं.

दरवडेखोरांच्या कान्हया भिल्ल नावाच्या नायकाला पकडण्यासाठी श्री दासगणूंची नेमणूक झालेली होती. लोणी या गावी ते रामदासीच्या गुप्तवेषाने एका श्रीराम मंदिरात राहिले. मंदिर झाडून साफसूफ करून रोज एकाग्र चित्ताने मूर्तीची पूजा ते करीत. त्यांच्या तेथल्या वागण्यामुळे कान्हया भिल्ल प्रभावित झाला. त्याने आपल्या गळयातील सोळा तोळे वजनाचा सोन्याचा गोफ त्यांना सादर समर्पण केला; पण दासगणूंनी त्याचा स्वीकार केला नाहीं. उलट, त्याच्या पैशातून देवळाची दुरुस्ती करण्यास पाटलास सांगितले. या निर्लोभ वृत्तीचा परिणाम भिल्ल नाईकावर झाला. दैववशात या कामगिरीतून प्रयत्नाने त्याची मुक्तता झाली.

जामखेड येथे ते बदलून गेले. येथे त्यांच्या सुप्त प्रतिभेचे नवे उन्मेष दीप्तिमान झाले. दामाजीपंतांच्या स्वयंकृत आख्यानावर त्यांनी येथे कीर्तन केले, श्रोते मुग्ध झाले.

पुढे नेवासे येथे बदली झाल्यावर तेथील नटनर्तक मोहिनी राजापुढे डफ फोडून तमाशाचा नाद त्यांनी सोडून दिला व आपली वाणी व लेखणी परमेश्वराच्या सगुणस्वरुपाच्या वर्णनात खर्च केली.

श्रीसद्गुरु साईनाथांच्या दर्शनाने ते पावन झाले. पुढे त्यांच्याच आज्ञेवरून त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व संतचरित्रे लिहिण्याचे कार्य त्यांनी स्वीकारले. श्रीसाईबाबांनी यासाठी त्यांचे कार्यक्षेत्र नांदेड मराठवाडा हे आगाऊच नियोजित केले होते. त्याप्रमाणे तिकडच्या भागात जाऊन त्यांनी कीर्तन प्रचार केला. संतचरित्र साहित्य जमविले व प्रत्यक्ष लेखनास सुरुवात करून काही काळाने ते लेखन संपविले.

श्रीदासगणू हे प्रभावी निर्लोभी कीर्तनकार होऊन गेले. कीर्तनाची बिदागी ते घेत नसत. इंदूर संस्थानच्या व देवास संस्थानच्या दरबारात त्यांची कीर्तने झाल्यावेळी आपल्या अंगच्या प्रसंगावधानाने उभय नरेशांच्या कौतुकाचा व आदराचा विषय ते झाले. श्रीसाईबाबांची त्यांच्यावर प्रीती

होती. त्यांची पण बाबांवर निष्ठा होती, धार्मिक व्रतवैकल्ये ते साक्षेपाने करीत. त्यांच्या कर्मनिष्ठेला त्यांच्या परिणत प्रज्ञेचे अधिष्ठान होते. गायत्री पुरश्चरणे त्यांनी तीनदा केली. गोदावरीला प्रदक्षिणापण त्यांनी एका सिंहस्थात केली. त्यांची काव्यसंपदा विपुल आहे. त्यांचे भाषाप्रभुत्व दांडगे होते. त्यांच्या लेखनातून भक्तीचा जिव्हाळा ओतप्रोत भरलेला आढळतो. त्यांनी लावण्या, पोवाडे, छक्कड, ओव्या, पदे, चरित्र, नाटक, मनाचे श्लोक, शिष्यबोध इत्यादी अनेक विषयांवर अंदाजे दोन लक्ष संख्या परिमित लेखन केले आहे. वेदांत हा त्यांच्या आवडीचा विषय. दंभाचा त्यांना अमाप तिरस्कार असे. त्यांच्या लेखनात अमाप रसोत्पत्ती, अभ्यासुवृत्ती आहे. त्यांची भाषा साधी खेडवळालाही समजावी अशी आहे. महाराष्ट्रातील आजच्या विद्वानांना त्यांच्या लेखनशैलीचे कौतुक वाटते. त्यांची बहुश्रुतता दांडगी होती. त्यांचा राष्ट्राभिमान, संस्कृतीबद्दलचा अभिमान, धर्म याबद्दलचे प्रेम अप्रतिम आहे. त्यांची वृत्ती मृदू, करुणामय, प्रभूला प्रार्थना करताना त्यांच्या नेत्रांवाटे गंगायमुनेच्या धारा प्रवाहित होत असत. ते साक्षात्कारी विभूती होते. त्यांचा मित्रपरिवार फार मोठा होता. त्यांच्या ऋणानुबंधीयांत शेठ, सावकार, व्यापारी, पांढरपेशे मध्यमवर्गीय यांच्याही भरणा असायचा. श्री दासगणूंनी समाजाला ईश्वराभिमुख करून त्याचे त्यांनी उन्नयन केले. असा श्रीसाईबाबांचा थोर भक्त, सेवक, महापुरुष कार्तिक वद्य एकादशी, दिनांक २५ ऑक्टोबर १९६२ रोजी पंढरपूर येथे श्रीपांडुरंगचरणी विलीन झाला. त्यावेळी त्यांचे वय ९५ वर्षाचे होते. त्यांची समाधी चंद्रभागेच्या वाळवंटात बांधली गेलेली आहे.

श्रीदासगणूंचे समग्र काव्यसंग्रह एकंदर नऊ खंडात आता पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले आहेत.

श्रीसाईबाबा हे परमात्म्याशी किंवा परमात्म्याच्या निरनिराळ्या रूपांशी अगदी मिसळून गेलेले होते. भक्तांनी जशी जशी इच्छा केली, तसे तसे बाबांनी त्यांना दर्शन दिले. कधी राम, तर कधी कृष्ण, कधी पांडुरंग तर कधी अक्कलकोटस्वामीमहाराज, कधी मौलवी, तर कधी कुणाचे सद्गुरु. अशा निरनिराळ्या स्वरूपात बाबांनी भक्तांना दर्शन दिलेले आहे.

एकदा दासगणूंनी बाबांच्याजवळ असताना पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनास जावयाची इच्छा व्यक्त केली. तशी परवानगी त्यांनी मागितली. परंतु बाबांच्या मनात दासगणूंना पाठवायचे नव्हते. म्हणून बाबा म्हणाले,

"अरे गणू, शिरडी हेच आपले पंढरपूर. आपल्याला शिरडी सोडून जाण्याचे कारण नाही."

दासगणूंचा बाबांच्यावर भारी विश्वास! ते विचार करू लागले, की शिरडी हेच जर आपले पंढरपूर, तर इथला पांडुरंग कोण? या विचारात ते मग्न झाले. तोच बाबा त्यांना साक्षात् पांडुरंग स्वरूपात दिसू लागले.

याच प्रसंगावर दासगणूंनी शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर । असे सुंदर पद रचले. रमा म्हणजे रखमाई व तिचा वर म्हणजे पती अर्थात रमेचा पती म्हणजे पांडुरंग.

एकदा याच दासगणूंना प्रयागला गंगा–यमुना या संगमस्थानी जाण्याची तीव्र इच्छा झाली. तेव्हा बाबा म्हणाले,

"गणू, आपले प्रयागतीर्थ येथेच आहे."

– आणि खरोखरीच आश्चर्याची गोष्ट, बाबांच्या दोन्ही आंगठ्यांतून गंगा–यमुना निथळू लागल्या, वाहू लागल्या, दासगणूंना हे पाहून नवल वाटले.

दासगणूंच्या प्रमाणेच गौळीबाबा नावाचे एक सत्पुरुष बाबांच्या वेळी होते. ते वर्षाचे आठ महिने पंढरपूरी राहून श्रीहरी पांडुरंगाची सेवा करीत व चार महिने तीर्थयात्रा करीत. ते बाबांच्यासमोर समाधी लावून बसत व सांगत, की त्या स्थितीत बाबा त्यांना पंढरपूरचे विठोबाच दिसत असत. आहे की नाहीं!

मुंबईचे एक डॉक्टर श्रीरामाचे मोठे भक्त होते. ते बाबांना मानीत नसत.

एकदा ते आपल्या मित्राच्या आग्रहाखातर त्यांच्या बरोबर शिरडीस गेले. परंतु 'मी जरी शिरडीस आलो, तरी मी बाबांना नमस्कार करणार नाहीं.' असे त्यांनी मित्राला निक्षून सांगितले होते. डॉक्टर व मित्र बाबांच्याकडे चालले होते. परंतु बाबा दुरून दिसल्याबरोबर डॉक्टर देहभान हरखून धावत सुटले व बाबांच्या पुढे जाऊन त्यांनी अक्षरश: लोटांगण घातले. बाबांनी त्यांना शुभआशीर्वाद दिले. ते परत निघाल्यावर मित्रांनी त्यांस विचारले,

"डॉक्टर, हे काय केलंत तुम्ही? तुमचा निश्चय तुम्ही विसरलात काय?"

डॉक्टर म्हणाले,

"अहो, कसला निश्चय नि कसचं काय? तिथे साईबाबा होतेच कुठे? मला त्यांच्या जागी अयोध्यापती प्रभू श्रीरामचंद्रजी दिसले व मी त्यांच्यापुढे लोटांगण घातले!"

आहे की नाही बाबांची अगम्य लीला.

ह. भ. प. संत श्रीदासगणूंनी बाबांच्या कीर्तीचा सुगंध आपल्या उभ्या हयातीत सातत्याने दरवळत ठेवला. त्यांनीच त्यांच्या कार्याचा प्रसार कीर्तनाद्वारे सर्वत्र केला.

धन्य ते बाबांचे सत्‌शिष्य दासगणूमहाराज. आजही शिरडीला पुण्य-उत्सव प्रसंगी दासगणूंचे नातू श्री. अनंतराव आठवले महाराज कीर्तने करीत असतात; व बाबांचे स्मरण करतात.

श्रीदासगणू एकदा शिरडीस असताना नीटनेटका पोशाख करून बाबांना भेटण्यास गेले. त्यांना वंदन केल्यावर 'नवरदेवासारखा सजून कुठे चाललास' असा बाबांनी प्रश्न केला. 'कीर्तन करावयास जातो' म्हणून दासगणूंनी उत्तर दिले. त्यावर बाबा म्हणाले, 'अंगरखा फटा कशास, किमर्थ केलास इतुका प्रयास हा सर्व भार कशास अंगावर घ्यावा? तो सर्व खाली काढून ठेव.'

तेव्हा त्यांच्या आज्ञेनुसार दासगणूंनी सर्व पोशाख बाबांच्या चरणावर ठेवला आणि तेव्हापासून 'तनु उघडी डोई न पगडी । कासेसीं साथीच पंचे जोडी' यात सांगितल्याप्रमाणे कीर्तन करण्याची त्यांची प्रथा पडली.

**ते पासूनी उघडे सोज्वळ ।**
**हाती चिपळी गळा माळ ।**
**कीर्तन समयी सर्व काळ ।**
**गणूदास हा वेळपर्यंत ॥२७॥**
**ही नारदीय मूळ गादी**
**येथूनचि हरिदासांची मांदी ।**
**बाह्य रंगाची न ज्या उपाधी**
**अंतःशुद्धि ध्येय ज्या ॥**

श्रीसाईसच्चरित्र अध्याय १५

याप्रमाणे लोकांच्या विनंतीला मान देऊन दासगणू नारदीय पद्धतीने कीर्तन करू लागले. 'एका कवडीचाही परिग्रह किंवा दुराग्रह तेथें ना' (अ. १५–१९) असा त्यांचा कीर्तनाचा बाणा असल्यामुळे श्रोत्यांची अतोनात गर्दी व अनिवार उडी कीर्तनप्रसंगी नेहमी होत असे. शिरडीस रामनवमी उत्सव १९१२ साली सुरू झाल्यावर चवथ्या वर्षापासून म्हणजे १९१५ सालापासून पुष्कळ वर्षे रामनवमी उत्सवात या नारदीय पद्धतीने ते कीर्तन करीत होते.

◆ ◆ ◆

# सापटणेकर कुटुंब

ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१ । १४ फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स,
बंड गार्डन रोड, पुणे ४११ ००१.

(श्री साईसच्चरित्रातील ४८ व्या अध्यायातील श्री सापटणेकर कुटुंबाची एक कथा आहे. त्या कथेतील बाबांचे साक्षात् दर्शन घेतलेल्या, कृपा प्राप्त झालेल्या श्रीमती पार्वतीबाई यांनी अगदी परवा परवा कथन केलेल्या बाबांच्या आठवणी श्री. निंबाळकरांनी शब्दांकीत केल्या आहेत. वाचकांना नक्कीच आवडेल असा हा लेख.)

**वकील अक्कलकोट निवासी । सपटणकर नाम जयांसी ।**
**परिसा तयांचे अनुभवासी । मन उल्लसित होईल ॥ ५१ ॥**
**असो तो मुलगा मुरलीधर । आणिक दोन भास्कर दिनकर ।**
**यांचियासमवेत सपटणेकर । प्रसन्नांतर जाहले ॥ १७२ ॥**
**मग ते सवे घेऊनि भार्या । करूनि वंदन साई सदया ।**
**साधुनि चंचल मनाचे स्थैर्या । होऊनि कृतकार्या परतले ॥ १७३ ॥**

(अध्याय ४८)

बुधवार १४ सप्टेंबर १९८३ हा दिवस माझ्याकरिता भाग्याचा उगवला. त्याआधी ३–४ महिने मला कळले होते की श्री साईसच्चरिताच्या ४८ व्या अध्यायात वर्णन केलेल्या अक्कलकोटच्या सापटणेकर वकीलांच्या कथेतील त्यांच्या चिरंजीवांपैकी कोणीतरी पुण्यात शिवाजीनगर येथे रहात आहेत. तेव्हापासून त्यांची भेट घेण्याची इच्छा झाली होती. परंतु नीट पत्ता माहित नव्हता. योगायोगाने टेलिफोन डिरेक्टरित शोध करता नंबर मिळाला व फोन करून भेट घेण्याचे ठरवले होते. परंतु काही ना काही कारणानी ते लांबणीवर पडले होते.

वरच्या दिवशी मात्र पहाटे उठल्यापासून ही भेट घेण्याची तीव्र इच्छा झाली. सकाळी ८–८॥ वाजता फोन केला परंतु सारखा गुंतलेला ऐकू येऊ लागला. नंतर कोणी उचलेचना. परंतु चिकाटी धरून पुन्हा फोन केला व

श्री. दिनकरराव महादेव सापटणेकर फोनवर आले आणि मी एक साईभक्त असून आपणांस भेटू इच्छितो असे म्हटल्याबरोबर त्यांनी आनंदाने जरूर या असे म्हटले. आणखी बोलताना त्यांनी सांगितले की अध्यायात दर्शविलेल्या तीन मुलांपैकी ते "दिनकर" आहेत. त्यांचे सर्वांत मोठे बंधू 'मुरलीधर'ही पुण्यात असतात आणि विशेष म्हणजे त्यांच्या मातोश्री श्रीमती पार्वतीबाई (वय वर्षे ८८) त्यांचेजवळच असून त्या सध्या पलंगावर झोपून असतात. हे सर्व ऐकून मला त्यांना कधी भेटतो असे झाले.

त्याच दिवशी संध्याकाळी ५॥ वाजता मी त्यांचे निवासस्थानी (करंदीकर बंगला, २५–१ शिवाजीनगर, पुणे–५) गेलो. आधी श्री. दिनकरराव भेटले ते निवृत्त जज्ज आहेत. वयाला ६५ वर्षे झाली असून डाव्या पायास अर्धांगवायू झाल्यामुळे बहुतेक घरातच असतात. त्यांनी लगेच मला त्यांचे मातोश्रींच्या खोलीत नेले. त्या उठून बसल्या होत्या. मला आठवते की याच माऊलीला बाबांनी स्वप्नात प्रत्यक्ष दर्शन दिले होते. तिच्या पोटाचे व कंबरेचे दुखणे आपण होऊन बरे केले होते व तिच्या पोटी तिच्या मागणीप्रमाणे पुत्ररत्न जन्मास घातले होते. अशा या श्रीसाईबाबांचे प्रत्यक्ष दर्शन, स्पर्श व कृपा लाभलेल्या भाग्यवान माऊलीला समोर पाहून मला धन्य वाटले व लगेच चरणांवर मस्तक ठेवून मी नमस्कार केला. नंतर प्रारंभिक विचारपूस झाल्यावर त्यांनी आपली कथा मला सविस्तरपणे ऐकविली. या वयातही आणि अशक्त-पणा असतांना देखील त्यांनी जेव्हा आपल्या खणखणीत आवाजात अत्यंत उत्साहाने, व हातवारे करून वर्णन सुरू केले तेव्हां ते ऐकताना त्यांच्या तोंडावरचे तेज, भक्ती व अत्यानंद पाहून मी मंत्रमुग्ध झालो.

त्या म्हणाल्या, "माझे लग्न झाले तेव्हा मी १३ वर्षांची होते व पती (श्री. महादेव वामन सापटणेकर) ३३ वर्षांचे होते व बिजवर होते. त्यांची पहिली पत्नी वारली होती व एक मुलगाही कंठ रोगाने वारला होता. माझे सासर माढेगावी होते परंतु हे अक्कलकोट येथे वकीली करीत होते. आधीच पहिली पत्नी व मुलगा गेल्याने हे उदास होते. त्यातून मलाही ४–५ वर्षे काहीही अपत्य न झाल्याने ह्यांना आयुष्य अगदी निरस वाटू लागले होते. मग एकदा (सन १९१३) माझ्या सासऱ्यांनी (त्यांना आम्ही बाबा म्हणत असू) ह्यांना शिरडीस श्रीसाईबाबांकडे जाण्यास सांगितले. ह्यांचे मित्र शेवडे यांजकडून श्रीसाईबाबांबद्दल आम्हा सर्वांना माहिती होतीच. आधी तर हे

नाहीच म्हणाले ह्यांचा विश्वासच नव्हता. परंतु त्याकाळी वडिलांपुढे मुलाने बोलण्याची हिंमतच नसायची. तेव्हा नाखुशीने का होईना पण हे आमच्या धाकट्या दीराला (पंडीतरावांना) घेऊन शिरडीस गेले. तेथे पोहोचल्यावर बाबांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार करण्यास गेले तर बाबा एकदम 'चल हट्' म्हणून ओरडले व हाताने असा धक्का दिला की ह्यांची पगडीच उडून पडली. हे फार नाराज झाले व एक दोन दिवस राहून तीच परिस्थिती राहिल्याने माढेगांवी परत आले, आणि बाबांवर (वडिलांवर) खूप चिडले. म्हणाले, मला उगाच तिकडे पाठवून माझा अपमान करविला तुम्ही. वगैरे.

हे जेव्हा शिरडीस गेले तेव्हा मला माढेगांवी ठेवून गेले होते. माझी शिरडीस ह्यांचेबरोबर जाण्याची फार इच्छा होती परंतु त्याकाळी आम्हाला नवऱ्यापुढे बोलायची सोय होती का? मी व माझ्या जाऊबाई जवळ जवळ झोपत असू. एके रात्री मी झोपेत असताना मला स्वप्न पडले. एकदम तेजोमय उजेड दिसला. त्याकाळी माढेगावात पाण्याची फार टंचाई होती. माझ्या लक्षात आले घरात पाणी अगदी नव्हते. तेव्हा पाणी भरून आणण्याकरिता गावात लक्कडशाच्या विहीरीवर कळशी घेऊन निघाले. त्याकाळी स्त्रियांनी घराबाहेर पडायचे म्हणजे फक्त हळदीकुंकवालाच. तेव्हा बाबा (सासरे) कोर्टातून परत यायच्या अगोदर परतायचे म्हणून घाईघाईने निघाले होते. विहीरीजवळ गेले तो तेथे डोक्याला फडका गुंडाळलेला एक मुसलमान फकीर उभा. तो माझ्याजवळ आला आणि म्हणाला "मी तुझी घागर भरून देतो." मी फार घाबरून गेले. मला त्याचा हेतु दुष्ट वाटला. त्यातून तो कफनी वर करून लघवीस बसला. हे पाहून तर त्याच्या दुष्ट हेतूबद्दल माझी खात्रीच झाली व मी तशीच घरी पळत सुटले. पण तो माझ्या मागे धावत आला आणि सारखा म्हणत होता, "परत जाऊ नकोस पस्तावशील, मी तुला पाणी द्यायला आलो आहे." मी घाबरत घरात शिरले आणि दार लावून घेतले. तरी तो बाहेर उभा राहून दाराच्या फटीतून खडे टाकीत राहिला व सारखा वरचे वाक्य "मी तुला पाणी द्यायला आलो आहे." म्हणत राहिला. इतक्यात मला जाग आली. पहाते तो माझ्या जाऊबाई माझे जवळ नेहमीसारख्या झोपलेल्या. मी त्यांना विचारले किती वाजले हो! त्या हसू लागल्या आणि चेष्टेने म्हणाल्या, "का झोप येत नाही का? हो बरोबरच आहे भावोजी तिकडे शिरडीस गेले आहेत ना? आठवण येत असेल?"

दुसरे दिवशी ही गोष्ट मी आमच्या चुलत सासूबाईना सांगितली. त्यांना सांगत असताना ती आमच्या सासऱ्यांनी ओझरती ऐकली तेव्हा त्यांनी आत येऊन पुनः सविस्तरपणे त्या स्वप्नाबद्दल चौकशी केली व त्यांना शंका आली की हा काहीतरी दैवी चमत्कार असावा. त्यांनी मग ह्यांना सांगितले की सूनबाईला शिरडीस जावयाची इच्छा होती व हे स्वप्नही म्हणूनच पडले असेल. तर तू तिला घेऊन शिरडीस पुन्हा जा. त्यावर हे चिडले व म्हणाले, 'तिचे काय ऐकता? तिच्या मनात घोळत होते म्हणून स्वप्न पडले असेल' मला आता तिथे जाऊन पुन्हा अपमान नाही करून घ्यावयाचा". त्यावर आमच्या सासऱ्यांनी ह्यांना समजावले व बरोबर स्वतःच्या वहिनीलाही (जिला अजूनपर्यंत मुलीच होत होत्या व मुलगा नव्हता) बरोबर नेण्यास सांगितले.

त्याप्रमाणे आम्ही शिरडीस जाऊन पोहोचलो. त्यावेळी श्रीसाईबाबा लेंडीबागेतून परत येत होते. त्यांना पाहताच मी थक्कच झाले. स्वप्नात दिसलेला हुबेहुब तोच फकीर! इतक्यात मला पाहून बाबा पोटावर हात धरून किंचाळू लागले "अग आई ग! माझे पोट लई दुखतेय कमरेला पण ठणका मारतोय." मला समजेना बाबांना एकाएकी काय झाले? पण इतर भक्तांनी आम्हांला समजाविले की आपल्या एखाद्या भक्ताला दुखणे आले की बाबा असेच स्वतःला दुखल्याचा देखावा करतात व त्याचे दुखणे बरे होते. मग मात्र बाबांच्या हुबेहुब नकलांचे मला हसू आले. त्यावेळी माझ्या लक्षात आले नाही परंतु जेव्हा दोन तीन महिन्यांनी माझ्या पोटाचे व कमरेचे दुखणे अजिबात आपोआप नाहीसे झाले तेव्हा बाबांची ती नक्कल मलाच उद्देशून होती हे समजले, आणि बाबांबद्दल कृतज्ञतेने उर भरून आले.

नंतर बाबा मशिदीत जाऊन बसल्यावर आम्ही फुलहार वगैरे पूजेचे सामान घेऊन दर्शनास गेलो. त्याकाळच्या परंपरेप्रमाणे हे आधी पुढे आणि मागे मी. हे बाबांच्या जवळ गेले तोच बाबांनी पूर्वीप्रमाणेच "चल हट" म्हणून ओरडून त्यांची संभावना केली. मी पुढे झाल्यावर मात्र बाबांनी शांतपणे मला आपले चरणावर डोके ठेवून दिले. त्याक्षणी मी अत्यानंदाने स्वतःला पार विसरून गेले होते. बाबांनी मूठभर उदी माझ्या डोक्यावर थापली आणि म्हणाले, "घे! एक, दोन, तीन, चार किती पाहिजे ते घे."

अशाप्रकारे इतर भक्त सकाळ संध्याकाळ बाबांपाशी आनंदाने दिवाळी अनुभवत असताना आपल्याला मात्र "चल हट्" म्हणून सारखा टोमणा,

यामुळे हे अगदी खिन्न झाले. जेवण पण गोड लागेना. ह्यांना शंका आली की आपण आधी बाबांविषयी संशय व कुतर्क धरला त्याचे तर हे फळ नसेल ना? मग ह्यांनी बाबांचा अनुग्रह घेतल्याशिवाय तेथून हलायचेच नाही असा निर्धार केला, आणि आश्चर्य म्हणजे थोड्याच वेळात बाबा एकटेच ह्यांना मशिदीत सापडले. हे लगेच धावत बाबांजवळ गेले, व सद्गदित होऊन त्यांचे चरण घट्ट धरले. बाबांनीही ह्यांचे मस्तकावर हात फिरवला व जवळ बसवून घेतले. इतक्यात एक धनगर बाई आली व बाबांचे नेहमीप्रमाणे पाय रगडू लागली. बाबा तिचेबरोबर गोष्टी करू लागले व त्यात हुबेहुब आपली स्वतः-चीच हकीगत ऐकून हे आश्चर्यचकित झाले. बाबा म्हणत होते, "हा म्हणतो मी याचे पोर मारले. मी काय लोकांची पोरे मारतो? असो आता मी त्याचे पोटी पुन्हा पुत्र आणून देतो". हे ऐकून ह्यांना अत्यंत आनंद झाला व बाबांना पुन्हा पुन्हा नमस्कार करून आम्ही उतरलो तिथे परत आलो.

बाबांना पुरणपोळीचा नैवेद्य न्यायचा ह्यांनी बेत केला परंतु पुजाऱ्याने शिरा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे आरती झाल्यावर सर्व भक्तांची नैवेद्याची ताटे बाबांपुढे ठेवली तेव्हा आमचे ताट मागे होते तरी बाबांनी पुढे वाकून लांब हात करून त्यातून मूठभर शिरा आधी उचलला व तोंडात टाकला.

त्यादिवशी गुरुवार होता व रात्री चावडीचा छबिना (मिरवणूक) पाहण्या-साठी आम्ही थांबलो. किती सुंदर तो छबिना! भक्त आनंदाने टाळ मृदुंगाच्या नादात भजन करीत व नाचत पुढे चालत, बाबा त्यांचे मागून येत. छत्र, चामर आणि पालखी पण बाबा पालखीत कधीच बसत नसत. भक्तांनी उचलून बसविले तरी लगेच ते पालखीच्या मागे दिसत. बाबा स्वतःदेखील हातवारे करून नाचत. एकदा हा पाय पुढे तर मग दुसरा अगदी पटाईतपणे, खरोखर ते दृश्य अजून डोळ्यांपुढे दिसते. अरे हो! ह्यांना तर बाबांच्या मुखावर अगदी पांडुरंगाच्या मुखासारखेच तेज दिसले!

दुसरे दिवशी आम्ही परत यावयास निघालो. बाबांचे दर्शनास जाताना हे मला म्हणाले, "बाबांना एक रुपया दक्षिणा देईन व आणखी मागितली तर पुन्हा एक रुपया देईन, परंतु पुन्हा मागितली तर मात्र हातातील आंगठी व छल्ले विकावे लागतील." आश्चर्य म्हणजे ह्यांनी बाबांचे हातावर एक रुपया ठेवल्यावर आणखी एकच मागितला आणि म्हणाले "आता आणखी नाही मागणार कारण तुला तुझी आंगटी व छल्ले विकावे लागतील." हे ऐकताच

ह्यांचे डोक्यात प्रकाश पडला. अजून बाबांविषयी ह्यांचे मन थोडे साशंक होते ते आता अगदी दृढ झाले. असो.

पुढे एका वर्षाचे आतच म्हणजे सन १९१५ साली मला मुरलीधर झाला. तो आठ महिन्याचा असतानाच त्याला घेऊन आम्ही शिरडीस गेलो. पुन्हा मला आणखी दोन मुले झाली. भास्कर आणि दिनकर. त्यांना घेऊनही शिरडीस गेलो. दिनकर तेव्हा २–३ महिन्याचा असेल. त्याला बाबांचे पायावर ठेवताच त्यांनी त्याला दोन हातांनी उचलून जोरात वर फेकला परंतु त्याला काही इजा झाली नाही. कोणी तरी भक्ताने त्याला झेलला.

पुढे मला एकंदर ८ मुलगे व १ मुलगी झाली. बाबा मला म्हणाले होते "घे एक, दोन, तीन, चार किती पाहिजे ते घे." आणि ते शब्द बाबांनी खरोखरच पूर्ण करून दाखविले. पहिला मुलगा मुरलीधर झाल्यापासून ह्यांची बाबांवर भक्ती अगदी दृढ झालीच होती. ती इतकी वाढत गेली व ह्यांची अध्यात्मात इतकी प्रगती झाली की आमचा दुसरा मुलगा भास्कर जेव्हा १० वर्षांचा असतानाच वारला तेव्हा ह्यांनी बाबांच्या छबीसमोर बाकी सर्व मुलांना गोळा केले आणि म्हणाले, "अरे! या सर्वांनाच तू घेऊन जा. चालेल. पण तुझी भक्ती मी सोडणार नाही."

वाचक हो! अशी आहे ही सापटणेकरांची रम्य व उपदेशपर कथा, प्रत्यक्ष त्या माऊलीच्या तोंडातून ऐकलेली. त्यावेळच्या आनंदात तुम्हालाही सहभागी करून घ्यावे म्हणून मी ही आपल्यापरीने शब्दांकित करण्याचा प्रयत्न केला आहे.

सापटणेकर कुटुंब मूळ सापटणे गावचे. पुढे ते तालुक्याच्या ठिकाणी म्हणजे माढेगावी स्थायिक झाले. पूर्वीपासूनच या घराण्याचा पेशा वकीलीचा आणि अजूनही त्यांच्या घराण्यात बहुशः तोच पेशा चालू आहे. या कथेचे नायक कै. महादेव वामन सापटणेकर यांनी अक्कलकोट येथे वकिली केली व तिथे स्थावर मिळकतही बऱ्यापैकी मिळविली. काही मंडळी पुण्यास १९६१ साली आली.

श्री. दिनकररावांशी नंतर बोलताना कळले की त्यांचे वडील पूर्वीपासून दत्तभक्त होते. गाणगापूरास नेहमी जायचे. तेथेच एकदा त्यांनी पत्नी व मुलगा वारल्यामुळे निराश होऊन नदीत जीव देण्याकरिता उडी मारली होती. परंतु

श्री दत्तात्रेयांनी साक्षात् त्यांना बाहेर काढून अक्कलकोटला जाण्याची आज्ञा केली होती. पुढे बाबांनी वर वर्णन केल्याप्रमाणे आपल्याकडे ओढून आणले आणि कायमचे जवळ केले होते.

यावरून एक गोष्ट सिद्ध होते की पूर्वपुण्याई व तपश्चर्या असल्याशिवाय संतांची भेट व अनुग्रह होत नसतो. तसेच हे सर्व ऐकून मला शंका यायला लागली आहे की श्रीदत्तात्रेय, अक्कलकोटस्वामी आणि आपण एकच आहोत हे दाखवून देण्याकरिता व सापटणेकरांचे आधीचे संसारातील दुःख व निराशेने आलेले वैराग्य अयोग्य व व्यर्थ होते ते घालवून त्यांना आपल्या भक्तीला लावून नंतर त्यांच्यात खरे ज्ञानजन्य वैराग्य व स्थितप्रज्ञता उत्पन्न करून त्यांचा उद्धार करावयाचा होता म्हणून तर बाबांनी ही 'चल हट्' लीला घडवून आणली नसेल ना? असो बाबांची भक्तांना सन्मार्गी लावण्याची व त्यांची अध्यात्मिक प्रगती करून घेण्याची हातोटी अलौकिक, आश्चर्यकारक व अगम्य आहे हेच खरे.

(टीप :– कळविण्यास वाईट वाटते की मी भेट घेतल्यावर अवघ्या दीड महिन्यानंतर म्हणजे ता. ३० ऑक्टो. १९८३ रोजी दुपारी ४ वाजता या भाग्यवान माऊली श्रीसाईचरणी लीन झाल्या. योगायोग म्हणजे हिंदु पंचांगा-प्रमाणे श्रीसाईबाबांच्या समाधीच्या महिन्याच्या व तिथीच्या दिवशीच फक्त वेगळ्या पक्षात आश्विन वद्य १० ला व तेही दुपारी ३–५१ वाजता दशमी पालटून एकादशी बसल्यावर दुपारी ४ वाजता त्यांचे देहावसान झाले. त्यावेळी त्यांचे वय ८९ वर्षांचे होते व त्या शेवटपर्यंत शुद्धीवर होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता म्हणजे १५ तासानंतर मी जेव्हा त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यास गेलो तेव्हा देखील त्यांचे चेहऱ्यावर अप्रतीम तेज होते.)

# मला दिसलेले श्री दासगणू

—सौ. नंदिनी माधव नाडकर
५ "शकुंत" ९-के. जी. एस कॉलनी.
सरस्वती बाग, जोगेश्वरी
मुंबई ४०० ०६०.

० १९३७ सालातील प्रसंग, त्यावेळेस आम्ही परळला रहात होतो. माझी आजी शिवण क्लास चालवीत असे, व शिवणकामाच्या शिकवण्याही करीत असे. त्यामुळे तिच्या बऱ्याच ठिकाणी ओळखी असत. त्यातीलच एक बॅरिस्टर वेलणकर ह्यांचा गिरगावात बंगला होता त्यांची पत्नी व सून देवभक्त होत्या. त्यांची व माझ्या आजीची मैत्री होती

एके दिवशी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्यांची गाडी आली. ड्रायव्हर आजीस सांगू लागला "वहिनीबाईंनी तुम्हाला बोलाविले आहे" आज बंगल्यावर श्री दासगणूंचे कीर्तन आहे" आजी मला म्हणाली "लवकर तयार हो," कारण आजी कोठेही जाताना मला नेत असे. मी त्यावेळेस जेमतेम ५-६ वर्षांची असेन त्यामुळे किर्तन समजण्याइतके माझे वयही नव्हते. परंतु मोटारीतून जावयास मिळते ह्या आनंदात मी होते. जाताना वाटेत आर. एम. भट हायस्कूलचे त्यावेळेचे प्रिन्सिपॉल श्री. दोंदे यांच्या पत्नींना पण बरोबर घेतले कारण त्यांनाही बोलावणे होते. आम्ही साधारण ५ च्या सुमारास वेलणकरांच्या बंगल्यावर पोहोचलो. बंगल्याच्या आवारात धूपाचा सुगंध दरवळत होता.

आम्ही वर गेलो. वरती प्रशस्त हॉलमध्ये सुंदर गालीचे घालून छान बैठक केली होती. चंदन व उदाचा वास दरवळत होता. समोरच श्रीसाई-बाबांची सुंदर तसबीर गुलाबाचा हार घालून सुशोभित केली होती. बैठकीवर निवडकच आमंत्रित भक्तिभावाने बसले होते, व फोटोसमोरच श्री. दासगणूंची पवित्र मूर्ती कीर्तनासाठी उभी होती ठेंगणी ठुसकी देहयष्टी. अंगात खादीचा शर्ट व पांढरे स्वच्छ धोतर, कपाळावर गंध व खांद्यापर्यंत आलेल्या पांढऱ्या केसांच्या बटा व प्रसन्न हसतमुख चेहरा. त्यांनी तासभर रसाळ कीर्तन केले. सर्व लोक तल्लीन झाले होते. खरेतर मला कीर्तन फारसे कळलेच नाही.

परंतु ते जे काही सांगत आहेत ते त्यांच्या मधुर वाणीत सारखे ऐकावे असे वाटत होते.

त्यानंतर दुग्धपानाचा कार्यक्रम झाला व आमंत्रितांना केशरमिश्रित दूध व प्रसादाचे पेढे देण्यात आले. निरुपणानंतर जेव्हा भक्त दासगणूंना नमस्कार करण्यास गेले तेव्हा "मला नमस्कार करु नका, श्री साईबाबांना करा, ते तुमच्या मनोकामना पूर्ण करतील व सर्वभूती परमेश्वर आहे हे आयुष्यात विसरु नका" असे त्यांनी सांगितले व माझ्या बालमनावर ते वाक्य पक्के कोरले गेले व मी आयुष्यात माझ्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी निष्पाप व निस्वार्थी वृत्तीनेच वागावयाचा प्रयत्न केला-हीच माझी जीवन-साधना व बाबांची भक्ती हेच माझे वैभव- त्याचा पाया ह्या कीर्तन प्रसंगाने घातला गेला म्हणूनच मला झालेले श्री दासगणूंचे दर्शन हीच माझ्यावर श्री साईनाथांची कृपा असे मी मानते, कारण इतक्या वर्षानंतर देखील तोच प्रसंग माझ्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष घडत आहे, अशी प्रामाणिक भावना दृढ होणे हे एरवी कठीणच, परंतु श्री साईबाबांच्या कृपेने मला तो प्रसंग नित्य डोळ्यासमोर येतो, आणि मन निरामय शांत होते, मार्गदर्शन होते-म्हणूनच तो प्रसंग मी माझ्या शब्दात लिहून काढला आहे व पाठवित आहे. कारण मला प्रत्यक्ष बाबांचे नाही पण बाबांच्या पट्टशिष्याचे-श्री दासगणूंचे दर्शन बाबांनीच घडवून आणले व मला पावन केले व मला भक्तीचा मार्ग दाखविला अशी माझी दृढ श्रद्धा आहे

ह्या घटकेला मी कर्तव्यतत्पर लेक, लेकी, सुना, जावई, गोड नातवंड व प्रेमळ पती ह्यांच्या सानिध्यात सुखी आहे, पण माझ्या सुखी संसाराचे रहस्य श्री साईबाबांचा आशीर्वाद हेच आहे माझे त्यांना शतशः प्रणाम !

# ....आणि श्री साईबाबा

**********************

शब्दांकन- श्री मनोहर नागेशराव सावंत
"उन्मेष"
८२-सी, जुना प्रभादेवी रस्ता,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५



० श्री. कुमारसेन प्रभाकर गुप्ते यांच्या आरती थिएटर्सतर्फे 'शिर्डीचे श्रीसाईबाबा' या नाटकाचा प्रयोग क्रमांक १९९ नुकताच पार पडला. याच नाटकाचा २०० वा प्रयोग कदाचित हा लेख छापून येण्यापूर्वीच थाटामाटात साजरा होईल. संस्थानचे माजी रिसीव्हर श्री. का. सी. पाठक यांच्या प्रोत्साहनाने श्री. कुमारसेन यांनी हे कार्य हाती घेतले. खरे पाहाता या नाटकाचा ३९ वा व शेवटचा प्रयोग १९७८ मध्येच श्रीसाईबाबांच्या साठाव्या पुण्यतिथीच्या दिवशी शिर्डी येथे व्हावयाचा होता हे पुष्कळांना माहित नसेल. अर्थात तो प्रयोग झाला पण शेवटचा मात्र ठरला नाही. ३९ व्या प्रयोगापर्यंत या नाटकानिमित्त श्री. कुमारसेन यांना रु. ५०,००० च्यावर नुकसान झालेले होते. शिर्डीचे श्रीसाईबाबा या नाटकाचे प्रयोग बंद करण्यापूर्वी शेवटचा प्रयोग शिर्डी येथे व्हावा अशी त्यांची त्यावेळी प्रबळ इच्छा होती.

शिर्डी येथे ३९ ला प्रयोग करण्याचे संस्थानचे रिसीव्हर श्री. काकरे यांच्या परवानगीने एक महिना अगोदरच ठरले होते. त्यासाठी श्री. कुमारसेन यांनी नाट्यमंदारचे श्री. राजाराम शिंदे यांच्यामार्फत एक बस ठरविली होती. प्रयोगाच्या आदल्या दिवशी रात्री ८ वाजता सर्वांनी शिवाजी मंदिर येथे जमावयाचे ठरविले होते. त्याचदिवशी संध्याकाळी ५ ते ५॥ च्या दरम्यान श्री. शिंदे यांनी या नाटकासाठी ठेवण्यात आलेली बस कोठेतरी बिघडलेली आहे व ते आता गाडी देऊ शकत नाहीत असे श्री. कुमारसेन यांना दूरध्वनीवर कळविले त्यांचा निरोप आल्याने श्री. कुमारसेन व त्यांच्या पत्नी सौ. अनुराधा साक्षात हादरलेच कारण शिर्डीला जाण्यास आता ऐनवेळी गाडी कोण देणार? त्या गाडीला लागणारा प्रवास परवाना कोठून आणणार? शेवटचा उपाय एकच-नाटकाचा प्रयोग रद्द करणे, त्यातही इभ्रतीचा प्रश्न होता, कारण शिर्डीला नाटकाची भरपूर जाहिरात करण्यात आली होती. या दरम्यान श्री. कुमारसेन यांच्या पत्नी सौ. अनुराधा यांनी याबाबतीत श्री साईबाबांना बराच दोष दिला व शेवटी गणपतीसही नवस केला. तासाभराने श्री. शिंदे यांचा श्री. कुमारसेन यांना पुन्हा फोन आला व त्यांनी सांगितले की ठरलेली बस जरी बिघडली असली तरी दुसरी बस पुण्याहून येत आहे व ती गाडी थोड्या उशीराने का होईना पण शिर्डीला जाण्यासाठी देऊ शकेन. त्याप्रमाणे दुसरी गाडी मिळाली व नाटकाचा ३९ वा प्रयोग करण्यासाठी मंडळी शिर्डीला निघाली.

शिर्डी येथील ३९ वा व शेवटचा प्रयोग सुरु होण्यापूर्वी श्री. कुमारसेन यांनी श्रीसाईसमाधीजवळ जाऊन श्रीफळ देऊन शेवटच्या प्रयोगास प्रत्यक्ष हजर व्हा अशी मनोभावे प्रार्थना केली प्रयोग ठीक ११ वाजता सुरु झाला व शेवटही जवळ आला. या नाटकात शेवटच्या अंकात शेवटी श्रीसाईबाबा ज्यावेळी देह ठेवतात त्यावेळी पोपटाचा पिंजरा जोरात हलतो असा प्रसंग आहे. हा पिंजरा हलविण्याची कळ रंगमंचामागून श्री. कुमारसेन प्रत्येक प्रयोगाच्यावेळी स्वतः दाबतात आणि लगेच पाचच मिनीटात हा प्रयोग संपतो प्रयोग संपल्यानंतर श्रीसाईबाबांना अभिवादन करुन श्रीसाईभक्तांपुढे हा शेवटचा प्रयोग झाला म्हणून जाहीर करणे तेवढेच बाकी होते. पोपटाच्या पिंजऱ्याची कळ दाबून रंगमंचकाच्या बाजूने पिंजरा कसा हलत आहे हे पाहाण्या-साठी श्री. कुमारसेन रंगमंचावर डोकावले तर त्यांना प्रत्यक्ष श्रीसाईबाबा रंगमंचकावर प्रेक्षकांकडे पाठ करुन बसलेले दिसले. त्यांनी आपल्या हाताचा कोपरा गुडघ्यावर टेकलेला होता. श्री. कुमारसेन यांचे त्यांच्याकडे लक्ष जाताच श्रीसाईबाबांनी आपला उजवा हात वर करुन श्री. कुमारसेन यांना आशिर्वाद दिला. त्याचवेळी श्रीसाईबाबांची प्रत्यक्ष सदेहमूर्ती लहान लहान होत गेल्या-

सारखे दिसले व तेथून सुदर्शनचक्र फिरते त्याप्रमाणे निळसर तांबूस रंगाचा लिंबूसारखा प्रकाशमान गोळा निघाला व तो क्षणार्धात श्री. कुमारसेन यांच्या छातीवर आदळला. श्री. कुमारसेन त्यावेळी एकदम ओरडून बेशुद्ध पडले.

हा प्रसंग शिर्डीत घडत असतांनाच मुंबईतील एका प्रसंगाकडे आपण येऊ या. श्री. कुमारसेन यांचे एक स्नेही श्री. पाटील वरळीस राहातात. श्री. पाटील यांचे स्नेही श्री कोठावळे जांबोरी मैदान येथील मंदिराची व्यवस्था पाहातात, श्री. कोठावळे यांचेच एक पुस्तक वाचून श्री. कुमारसेन यांनी शिर्डीचे श्रीसाईबाबा हे नाटक करावयास घेतले. ज्यादिवशी शिर्डीमध्ये या नाटकाचा ३९ वा प्रयोग होता त्याचदिवशी रात्रौ ११-२० ला श्री. कोठावळे यांच्या घरातील श्रीसाई-बाबांच्या सर्व तसबिरी धरणीकंप झाल्यासारख्या जोराजोरात हलू लागल्या. रात्रौ ११ वाजताच हे नाटक शिर्डीत सुरु झालेले होते, व याच नाटकात श्रीसाईबाबांचा पहिला प्रवेश बरोबर २० मिनीटांनी होतो. श्री. कोठावळे त्याचवेळी शेजारी राहाणाऱ्या श्री. पाटील यांना म्हणाले की ज्याअर्थी माझ्या घरातील श्रीसाईबाबांच्या तसबिरी धरणीकंप झाल्यासारख्या हलत आहेत त्याअर्थी शिर्डीत काहीतरी गंभीर घटना घडली असावी. श्री. कुमारसेन यांच्यासंबंधीची हकीकत श्री. कोठावळे यांना दुसऱ्या दिवशी समजली तेव्हा त्यांच्या घरातील तसबिरी हलण्याचा खुलासा त्यांना झाला. रात्रौ ११-२० ला श्रीसाईबाबांनी समाधी सोडली होती व ते नाटकाच्या प्रत्यक्ष प्रवेशाच्या वेळी कोणालाही दिसणार नाही अशा स्वरूपात रंगमंचावर अवतरले होते!

श्री. कुमारसेन बेशुद्ध पडले त्याप्रसंगी त्यांच्या पत्नी सौ. अनुराधा, मुलगी चि. आरती, मुलगा चि. सिद्धेश, रिसीव्हर श्री. काकरे, श्री. बाकलीवाल श्री. डी. सी. पाटील इत्यादी मंडळी हजर होती. एवढे होता होता हा प्रयोग संपला, व अर्थात श्री. कुमारसेन हे बेशुद्ध असल्याने हा शेवटचा प्रयोग म्हणून जाहीर करू शकले नाहीत. श्री. कुमारसेन यांना श्रीसाईबाबांची उदी लावली त्यावेळी त्यांना कुठले त्राण आले समजले नाही परंतु ते एकसारखे पळू लागले. त्यावेळी त्यांना आवरून दीक्षितवाड्यातील त्यावेळेच्या भोजनगृहात व तेथून त्यांच्या निवासस्थानी शांतिनिवास येथे नेण्यात आले. भोजनगृहात श्री. कुमारसेन श्रीसाईबाबांच्या प्रतिमेकडे एकटक पहात होते व श्रीसाईबाबा ज्या स्थितीत बसतात त्याच स्थितीत बसून असस्खलित हिंदीत बोलत होते. श्री. कुमारसेन यांची प्रकृती वेड्यासारखी होत असलेली पाहून त्यांना झोपेचे इंजेक्शन दिले.

श्री. कुमारसेन यांना रात्रौ इंजेक्शन दिले तरी त्यांना बिलकूल झोप लागली नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे काकडआरतीच्या वेळच्या घंटानादानेच ती उतरली याचा अर्थ असा लागू शकतो की श्रीसाईबाबा रात्रौ ११–२० ला जे नाटकाच्या रंगमंचावर अवतरले होते ते परत सकाळी काकडआरतीच्यावेळी पुनश्च आपल्या समाधीत गेले.

या प्रसंगानंतर मात्र श्री. कुमारसेन यांचे "शिर्डीचे श्रीसाईबाबा" या नाटकासंबंधीचे एक एक व्याप सुटत गेले आणि या नाटकाची आणि त्यांची दिवसेंदिवस भरभराटच होत गेली.

श्री. कुमारसेन हे केवढे भाग्यवान! "श्रद्धा आणि सबुरी" हे श्रीसाईबाबांचे दोन शब्द! श्री कुमारसेन यांना श्रीसाईबाबांनी आपले प्रत्यक्ष दर्शन देऊन त्याचा पुरेपुर अनुभव दिला.

---

# 'अल्ला–मालिक'चा अर्थ

–र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव,
पुणे ३०.

० श्रीबाबा 'अल्ला–मालिक' हा जप त्यांच्या बालवयापासून करीत. या जपाचा अर्थ काय? अल्ला म्हणजे ईश्वर. मालिक म्हणजे मालक. थोडक्यात म्हणजे ईश्वर या जगाचा मालक आहे.

मालक हा शब्द मालकीहक्क दाखविणारा आहे. हुकुमात दर्शविणारा तो शब्द आहे. ही हुकुमत तो गाजवो किंवा न गाजवो, सत्ता त्याची आहे. ती मानणारे लोक त्याच्याहून कनिष्ठ आहेत.

मालक आणि नोकर हे शब्द या दृष्टीने विरुद्ध अर्थाचे शब्द आहेत. मालक तो मालक, नोकर तो नोकर नोकराने मालकाचा हुकूम मानला पाहिजे.

तो त्याचा धर्मच होय. नोकर हुकूम न मानील तर तो आपल्या स्थानावर राहाणार नाही.

अल्ला हा साधा मालिक नव्हे, श्रेष्ठ मालिक आहे. त्याची सत्ता अबाधित आहे. त्याच्या इच्छेविना पानसुद्धा हलू शकणार नाही. थोडक्यात म्हणजे आपले जीवन त्याच्या हाती आहे. फार काय, आपला श्वासोच्छ्वासही त्याच्या इच्छेने चालतो. त्याची इच्छा फिरली की आपला श्वासोश्वास बंद पडला! आपले सर्व जीवनच संपुष्टात आले!

अल्ला हा केवळ मानवांवर सत्ता गाजविणारा नाही. सजीव आणि निर्जीव सृष्टीवरही त्याचीच सत्ता चालते. सृष्टीची उत्पत्ती–स्थिती–लय त्याच्याच हाती आहे. ज्याची आवश्यकता आहे, त्याची उत्पत्ती तो करतो. त्याला स्थिती म्हणजे स्थिरता देतो. जे जीर्ण झाले त्याचा लय म्हणजे नाश तो करतो. ज्याचा उपयोग आहे तेच अल्ला–मालिक निर्माण करतो. त्याचे जतन करतो. त्याचा उपयोग संपला की त्याचा नाश करून टाकतो.

अशी ही नाणी वितळविण्याची आणि पुनःपुन्हा छापात घालून पाडण्याची क्रिया सतत चालू असते. त्यामुळे टांकसाळ कधी बंद पडली असे होत नाही.

हे सर्व कार्य अल्ला–मालिक आपल्या नोकरांकरवी करवितो. ते नोकर सर्वांना दिसतात. पण अल्ला–मालिक कोणालाही दिसत नाही. तो स्वस्थानी स्वस्थ असतो. कार्य करीत असते ती त्याची सत्ता!

सत्ता म्हटली की तेथे दुसऱ्यांच्या अधिकारांचे नियमन आले. त्यांच्यावर योग्य ती बंधने आली. त्या बंधनांत राहून कार्य करणे आले. जो ती बंधने तोडील तो द्रोही ठरला. याचे कारण बंधनांचे महत्त्व हे याला कळले नाही. थोडक्यात म्हणजे अल्ला–मालिकांची आज्ञा त्याने झुगारली.

बंधने किंवा कायदे नेहमी सर्वांच्या कल्याणासाठी असतात. ते पाळण्यातच सर्वांचे कल्याण असते. अल्ला–मालिक जे कायदे करतो ते कायदे आपल्या नोकरांमार्फत तो राबवितो. ते नोकर म्हणजे संत होत.

अल्लाच्या आज्ञा काटेकोरपणे पाळणारे व त्याचे कायदे म्हणजे प्रेमबंधन मानणारे एक संतच होत. मी अल्लाचा बंदा आहे, गुलाम आहे, नोकर आहे

असे ते अभिमानाने सांगतात. अल्लाच्या प्रेमाच्या तुरुंगातील कैदी होऊन राहाणे ते आनंदाने पसंत करतात.

मी अनलहक्क नव्हे, यादेहक्क आहे असे श्रीबाबा सांगतात. याचा अर्थ मी मालिक नव्हे, नोकर आहे, असा आहे.

जेव्हा नोकर मालकाच्या कार्याशी एकरूप होतो तेव्हा तो नोकर राहातच नाही. तो मालक होतो. तिजोरीच्या किल्ल्या त्याच्या हाती येतात. पण तो लोकाना सांगतो, "हे ऐश्वर्य माझे नव्हे माझ्या धन्याचे आहे. मी केवळ विश्वासू नोकर आहे."

मालकाचा विश्वास संपादन करणे ही गोष्ट सोपी नाही. फार अवघड आहे. जामदारखान्याच्या किल्ल्या आपण चोराच्या हाती दिल्या असे मालकास वाटता कामा नये. असे वाटणे हा नोकराचा उणेपणा आहे. येथे नोकर हा नोकरसुद्धा राहिला नाही. चोर झाला. चोर कोणाचाही विश्वास संपादन करू शकणार नाही.

श्रीबाबा जेव्हा 'अल्ला–मालिक' हा जप करीत तेव्हा जणू म्हणत, "मी अल्लाचा इमानी नोकर आहे. म्हणून त्याच्या विश्वासास पात्र आहे. पात्र नसेन तर मला पात्रता वाढविली पाहिजे. त्याशिवाय त्याचा शिक्का माझ्या हाती ठरणार नाही. मी यत्किंचितही बेईमान होईन तर तो अल्ला–मालिक आपला शिक्का माझ्या हातून काढून घेईल!"

या विचारांचे स्मरण कायम राहावे म्हणून श्रीबाबा हा जप करीत. अर्थात् हा जप म्हणजे लोकसंग्रहच होता!

☆

# बाबांची आज्ञा

—श्री. बाळकृष्ण अ. देसाई.
१५१, भांगरवाडी, लोणावळा—४१० ४०१

० कोपरगाव सरकारी इस्पितळ. त्या इस्पितळातील डॉक्टर, नर्स, आया ह्यांच्या डोळ्याला डोळा लागला नव्हता तीन दिवस. का, तर इस्पितळात उपचारासाठी आलेल्या पेशंटच्या प्रकृतीचं निदान करता येत नव्हतं त्यांना. त्या पेशंटने तीन दिवसात डोळे उघडलेच नव्हते. मग बोलणं तर नाहीच नाही.

इस्पितळातील नोकरवर्ग पार घाबरून गेला. अन् विशेष म्हणजे त्याचं जर बरं वाईट झालं, तर इस्पितळातील नामांकित डॉक्टर, सेविका नि आया ह्यांची निष्काळजीपणाची ओरड होऊन बदनामी होणार होती.

डॉक्टरानी इतकी काळजी वाहावी असा तो पेशंट तरी कोण होता? तो होता एक प्रतिष्ठित इंग्रज गृहस्थ. त्याच्या मूकावस्थेत त्याच्या सर्व अवयवांची परीक्षा करण्यात आली होती.

शंका आली की, तिला अनेक वाटा फुटतात. पोट, छाती, डोळे बरगड्या यांना मुका मार तर बसला नसेल? की मेंदूत रक्तस्राव होऊन हा गेले तीन दिवस बेशुद्धावस्थेत डोळे मिटून हालचाल न करता पडून राहिलाय! जिवंतपणाचं लक्षण म्हणजे नुसतं त्याचं कण्हणं!

त्यातील एक तरुण डॉक्टर आपली हतबलता बोलून दाखवित असता, अकस्मात चमत्कार घडला. पेशंटने हलकेच डोळे उघडले, नि बोलू लागला. 'डॉक्टर, मला काहीही झालेलं नाही, की होतही नाही! निमित्तमात्र पाठीला खरचटण्याचं झालं. यापेक्षा अधिक काही नाही.

त्या बड्या इंग्रज पेशंटने आपले डोळे पुन्हा मिटून घेतले. नि एवढंच म्हणाला, 'अपघात आहे हा! तेव्हा एवढी दुखापत ही व्हायचीच! पण प्रभूची मोठी कृपा म्हणून यातून वाचलो!'

हळू हळू शुद्धीवर आल्यावर तो इंग्रज गृहस्थ म्हणाला, 'ह्या तालुक्यातील डॉक्टरात कोण गडबड उडाली! का तर राज्यकर्त्यांचा मी माणूस! तशात इंग्रज! इतर स्थानिक पेशंटाकडे दुर्लक्ष करून सारे माझ्याकडे धावले. उशा-पायथ्याशी बसले. इतकी गुलामगिरी ह्यांच्यात खोलवर पोचली, की सर्वांनी गोऱ्या कातडीकडे धाव घ्यावी!'

त्याचं असं झालं, हा इंग्रज टांग्यातून जात असता, टांग्याला अपघात होऊन तो रस्त्याबाहेर फेकला गेला, म्हणून तोच ह्या जवळच्या कोपरगावच्या इस्पितळात आला.

शुद्धीवर आल्यावर आता त्याचा वेळ जाईना. त्याला बोलायला कुणीतरी हवं होतं, अन् तो कुणीतरी असून भागणारं नव्हतं. चांगला सुशिक्षित, इंग्रजी जाणणारा नि बोलका हवा होता.

डोळे उघडे ठेवून इकडे तिकडे पाहाण्यात त्या इंग्रज गृहस्थाचे दोन दिवस असेच गेले. तिसऱ्या दिवशी एक सुशिक्षित महाराष्ट्रीय तरुण त्याला काय होतंय नि इतकी धावपळ करण्यासारखं काय घडलंय हे जाणून घेण्यासाठी अन् त्या पेशंटला पहाण्यासाठी तिथं आला.

शिष्टाचाराप्रमाणे अगोदर एक चिठी पाठविली, नि उत्तराची वाट पहात खोली बाहेर उभा राहिला. थोड्याच वेळात 'आपण आल्यानं मला आनंदच होईल! या!' असा निरोप आला.

मी आत गेलो नि घडलेलं सारं विचारून घेतलं. तेव्हा त्या इंग्रजाला असं म्हणायचं होतं की, 'बरेचसे अपघात शिरडीला कुणी अवलीया आहे, त्याची भेट घेऊन परतणारालाच ते होतात असं ऐकतो तेव्हा यात काहीतरी जादूटोणा, भानामती असावी. कारण भारतीय लोक ह्या विद्येत प्रवीण आहेत. ते सर्पांना खेळवतात. त्यांच्या अंगात भुतं, देव यांचा संचार होतो, नि मग त्यांची जमलेल्या लोकांस बडबड सुरु होते, असं ऐकलंय! म्हणून मला तसं वाटतं, तो अवलियाच काहीतरी मिळण्याच्या अपेक्षेनं जादूटोणा करीत असला पाहिजे.'

ह्या त्यांच्या बडबडण्यानं आमच्या तरुणास हसू फुटलं. पण त्यानं ते दाबलं नि म्हटलं, 'जे घडतं ते सत्य असतं. पण त्याचं कारण कुणी काही

तर कुणी काही, अनेक प्रकारांनी लावून आपल्या बुद्धीला सुचेल तसं स्वतःचं समाधान करून घेत असतो. तुम्हा परकीयांचा भारताबद्दलचा ग्रहच मुळी ठरून गेलेला आहे. तेव्हा तुम्हाला तसं वाटावं यात गैर नाही पण कार्य नि कारण यांची सांगड वेगळ्या प्रकाराशी जमलेली असते, हे विधान करणारे नजरेपुढे ठेवीत नाहीत. अन् कुणावरही वाटेल तो आरोप बेलाशक केला जातो. याचं मी एक आपल्याला उदाहरण देतो."

भारतातील एक विद्वान नि गणितातील उच्च रँगलर पदवी मिळविलेले रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे विसाव्या शतकाच्या आरंभी इंग्लंडमध्ये गणिताच्या अभ्यासासाठी–रँगलर पदवी मिळविण्यासाठी गेले होते. कॉलेजमध्ये प्रोफेसर कोणतेही उदाहरण शिकवू लागले, किंवा गणितातील मोठमोठाले गुणाकार, भागाकार फळ्यावर लिहू लागले की परांजपे चटकन् उभे राहून म्हणत, 'हे मला येतं, हे मी चटकन करू शकतो.'

'मग सांग पाहू १५५ चा वर्ग!' नि परांजपे चटकन उठून सांगत २४०२५ (चोवीस हजार पंचवीस).

'इतका झटकन् हा तू कसा केलास?'

'सर, आमची उजळणी लहानपणीच सगळी झालेली असते. अकरकी' एकोत्री, टाक, शेर, मण वगैरे, नि हा १५५ चा वर्ग करताना ५ एकंचा वर्ग २५ आणि' मागील १५ त १ मिळवून पंधराचे सोळा करून त्यानी पंधराला गुणलं म्हणजे १५–१६–२४० येतात. (पंधरा दीड शतक, म्हणून' सोळा दीडे २४ दशक, म्हणजेच २४०) आणि मग एकूण वर्ग २४०२५ होतो.

हा खुलासा ऐकल्यावर सर्व विद्यार्थी आश्चर्यचकित झाले. तोपर्यंत त्यांच्या बरोबरच्या सर्व विद्यार्थ्यांची समजूत परांजपे भारतीय. म्हणून भानामती, जादूटोण्यानंच हा गणित करतो, अशी होती. हे परांजपे रँगलरच्या परीक्षेत सर्व प्रथम आले, नि जगाचे डोळे दिपले. असं आहे कार्य नि कारण यांचं नातं!'

अशीच काही बोलणी झाल्यावर तो मराठी भाषिक तरुण म्हणाला, 'कुणी मला काही म्हणो, मी मात्र साईबाबांचा भक्त आहे. भोळा भक्त नाही, त्यांच्या ठिकाणी एकनिष्ठा आहे, म्हणून म्हणजे अशा प्रसंगामागं बाबांचीच

प्रेरणा असावी, नि भक्तांना काही शिकवावं, त्यांच्या ठिकाणी विवेक जागृत करावा, मात्र त्यांचं मोठ्यात मोठं नुकसान होऊ नये, यासाठीच ती असावी!'

त्यावर तो इंग्रज म्हणाला, 'साधु म्हटला म्हणजे दया, क्षमा, शांतीचं माहेरघर. त्याला एकच ठाऊक असतं, अपकाराची फेड उपकारानं करणं. येशूच्या बलिदानाच्या वेळी त्याला क्रुसावर चढवून हाता-पायांना खिळे ठोकीत असता, येसूनं देवाची एवढीच प्रार्थना केली, हे देवा यांना क्षमा कर! आपण काय करीत आहोत, याचं त्यांना ज्ञान नाहीं.
मग बाबांनी त्यांच्यावर संकटं आणून त्यांना दवाखान्यात का खितपत ठेवले?'

त्यावर तो तरुण त्या इंग्रजाला म्हणाला, 'तात्याबा कोते पाटील बाबांच्या अंगाखांद्यावर खेळलेला बाबांचा मोठा भक्त! त्यांच्या आज्ञा पाळणारा, कधीच त्यांच्या दृष्टीआड न होणारा. असं असता पाटील एकदा बाबांना म्हणाले, 'कोपरगावच्या आठवड्याच्या बाजाराला जाऊन येतो!'

बाबांच्या आज्ञेशिवाय शिरडीबाहेर कुठंच पाऊल टाकायचं नाही हा पाटलांचा नियम म्हणून त्यांनी आज्ञा मागितली. बाबा म्हणाले, 'जाऊ नकोस! आजच गेलं पाहिजे असं थोडंच आहे? मी सांगेन तेव्हाच जा!' पण पाटील जाण्यास उतावीळ झाले होते. त्यांचा तो तीनशे रुपयांचा नवीन घेतलेला घोडा, खिशात नोटांनी भरलेली पिशवी. अन् नवा रुबाबदार पोषाख. अशा थाटात ते निघाले होते. पण बाबांनी त्यांना नकार दिला.

पाटलांचा हिरमोड झाला. ते मनात म्हणाले, 'बाबांचं आपलं हे नेहमीचंच! आपण योजावं एक नि बाबांनी सांगावं भलतंच! कुणीकडूनतरी मोडता घालायचा!'

पाटलांची खिन्न मुद्रा पाहताच बाबा म्हणाले, 'जातोसच तू, जा बापडा! पण जाताना शामाला बरोबर घेऊन जा!'

पाटलांनी तसाच पळ काढला. मशिदीबाहेर टांगा उभा होताच. टांग्यात बसताच घोडे भरधाव पिटाळले. ते बेफाम झाले अन् दूर अंतरावरील साऊळ विहीर त्यांनी गाठली. आता आपण हां हां म्हणता कोपरगाव गाठणार ह्या मनोराज्यात असता कधीच चाबकाचा स्पर्श अंगाला लावून न घेणारा घोडा

चाबकाच्या फटकाऱ्यासरसा बेफाम उधळला नि कंबरेत लचकला, अन् धाडकन् खाली कोसळला. नुकतेच त्याच्यासाठी तीनशे रुपये मोजलेले होते. टांगा उलटला नि त्याखाली तात्या सापडले. नशीब त्यांचं लोकांनी धावाधाव करून त्यांना बाहेर ओढून काढलं.

एवढं झाल्यावर तात्या कोत्यांच्या सारं काही ध्यानात आलं. त्यांचे डोळे उघडले. जाताना बाबा म्हणाले होते, 'जातोसच तर जा, पण बरोबर शामाला ने!'

बाबांनी आपलं कर्तव्य केलं. जी गोष्ट तात्या कोत्यांची तीच तात्या कोल्हारांची. तात्या कोल्हार असेच घोड्यावर बसून आले. जातो आता एवढंच बोलून बाबांची भेट घेऊन तडक टांग्याकडे वळले. आत बसले नि टांगा निघाला अन् भरधाव धावडीला लागलेला तो घोडा जोरानं बाभळीच्या झाडावर आदळला तात्या बाहेर फेकले गेले. नशीब! म्हणूनच वाचले.

हे जे वर सांगितलेले तात्या कोते नि तात्या कोल्हार यांना अपघात झाले, ते बाबांना अगोदरच ते निघण्यापूर्वीच जाण्याची परवानगी घेतानाच दिसून आले होते. यात भानामती, जादूटोणा किंवा भुताटकी काहीच नव्हती. होती ती बाबांची अवज्ञा. ते नको म्हणत असताही ते दोघे निघाले, नि मृत्यूच्या दारातून परतले. अन् परतले ते त्यांच्या पाठीशी असलेली बाबांची पुण्याई.

'आता तुम्ही सांगा इथं कसं काय इस्पितळात?' तरुणाचा प्रश्न.

'त्याचं असं झालं, मी चांदोरकरांच्या सांगण्यावरून माधवराव देशपांडे यांना त्यांचे पत्र घेऊन आलो. पण मला मशिदीत प्रवेश मिळाला नाही. माधवरावानी मला स्वतंत्र तंबू दिला व्यवस्था छान केली मात्र मशिदीपाशी माझ्या तीन खेपा होऊनही प्रवेश मिळाला नाही, अन् तो का तेच कळलं नाही

माझ्या मते बाबा म्हणजे साक्षात् येशू त्यांच्या मुखमंडलावर कोटी सूर्यांची दिव्य प्रभा आहे मानव जातीच्या दुःखामुळं त्यांचे डोळे कारुण्याने भरलेले असतात दुःखार्तांना आपल्या बाहूत ते ओढून घेतात, त्यांना हृदयाशी धरतात ते थोर आहेत यात मुळीच संशय नाही पण माझ्या बाबतीत असं का व्हावं हाच मोठा प्रश्न आहे

त्यानंतर दुरुन बाबांना नमस्कार करून म्हटलं, येतो मी! मला मुंबईला परतण्याची घाई आहे!

तेव्हा बाबा म्हणाले, 'घाई का? जाशील! आताच कसली आलीय घाई? उद्या जा!'

'पण मी निघालोच! बाहेर टांगा उभा होताच अन् विहिरीपाशी येताच टांग्याचे दोन्ही घोडे बिथरले, नि पुढं होऊ नये ते घडलं, अन् हा इथं आलो इस्पितळात!'

'एकूण दोन तात्या नि आपण एकाच कारणात वसत आहात तर अन् ते म्हणजे बाबांची अवज्ञा!'

म्हणून बाबांच्या आज्ञेबाहेर वागणं म्हणजेच संकटांना आमंत्रण देण्यासारखच आहे. त्यांना पुढचं दिसतं, म्हणून ते आग्रह करून आता नको, उद्या किंवा एकदोन दिवसांनी असं भक्तांना सांगतात, ते केवळ मायेपोटी भक्तांच्या कल्याणासाठी. पण आपण चढलेले असतो घोड्यावर! त्याला इलाज कुणाचा? म्हणून अगोदर पाहिजे श्रद्धा. त्यानंतर सबुरी नि आज्ञापालन. असं झालं म्हणजे मनःकामना पूर्ण व्हायला कितीसा अवधि लागणार?

आज्ञा पाळण्यासाठी असते. वाऱ्यावर सोडून देण्यासाठी नसते. तशी ती करणारांची कधीच अपेक्षा नसते. उभयपक्षी काही हेतु असतो, म्हणूनच ती केलेली असते.

# माझिया भक्तांचे धामी ।
# अन्नवस्त्रास नाही कमी ॥

—सौ. रेखा भा. माहीमकर
२२।१६ गुरुनगर,
चार बंगला,
अंधेरी (पश्चिम) मुं. ४०००५८

**० प्रारब्ध असे मानवी कपाळी । न चुके ते कधी काळी ॥**

मग ते याच जीवी भोगून पुरे करावे. प्रारब्ध भोगण्यासाठी पुन्हा जन्म नको. असे साधुसंतांनी सांगितले असताना, त्यासाठी त्रागा कां बरे करावा. हा त्रागा नको असेल तर आमच्या साईमाऊलीला पूर्ण शरण गेले पाहिजे. ज्यांच्यावर साईमाऊलीची कृपा आहे त्यांना कोणतेही भोग भोगताना क्लेश होत नाहीत तर ते कमी होतात असा माझा अनुभव आहे. साईमाऊलीच्या कृपेने आपले भोग भोगण्याचे सामर्थ्य, बळ, शक्ती, आपल्या अंगी येते. आजार व संपत्तीचा वियोग यातर संसारातील फार मोठ्या आपत्ती आहेत. याहीपेक्षा सर्वात मोठी आपत्ती म्हणजे बदनामी. नावाला कलंक लागण्या इतकी मोठी आपत्ती नाही पण अशासारख्या मोठ्या आपत्तींना तोंड देण्याचे मनोधैर्य बाबाच देतात. ज्यावेळी या संकटातून आपली मुक्तता होते. एक प्रारब्ध भोगून मोकळे होतो तेव्हा बाबा आम्हांला त्याचे मधुर फळ देतात. सदैव बाबांचा धावा केल्याने मिळणाऱ्या या मधुर फळाची गोडी फार अवीट असते. फक्त श्रद्धा व सबूरीची गरज असते.

आमच्या चौघांच्या छोट्या कुटुंबात आम्ही उभयता प्रत्येक सुखदुःखाला एकमेकांच्या मदतीने सामोरे जात असतो. या दोन्हीवेळी एकच व्यक्ती आम्हांला धीर देत असते. ते म्हणजे बाबा. सासरच्या सर्व व्यक्तींनी आमच्याकडे केव्हाच पाठ फिरविली आहे कारण माहित नाही पण पैसाच असावा. ऐन तारुण्यात आम्ही दोघांनी पैशाची चणचण भोगली. त्यावेळी कुठल्याही नातेवाईकांचा आधार न घेता फक्त साईनामाचा जप मुखी ठेवला. यातून सुटका झाली. आम्हां दोघानाहीं चांगली नोकरी मिळाली. मुले झाली. संसाराचा गाडा रुळावर येतो न येतोच अगदी जवळच्या नातेवाईकांनी कोर्टदरबार दाखवले. विश्वासू व मायेचे एकच माणूस पण त्यांनीच जबरदस्त आघात केला. आम्ही

सुप्त झाले तर समोर बाबा उभे होते. बाबांनी आशिर्वादाचा हात वर केला. धैर्य आले. रोज रात्री एक अध्याय माझे यजमान वाचत असत. दिवसा संपलेले मनोधैर्य पुन्हा सकाळी प्राप्त होई. असे दिवस जात होते. तब्बल आठ महिन्यानंतर निकाल आमच्या बाजूने लागला. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे आमचे वकील आमच्या ओळखीचे नव्हते तरी त्यांनी एकही पैसा घेतला नाही तर ते आमच्यावर बाबांच्या कृपेने पितृवात्सल्याने प्रेम करू लागले. या संकटा नंतर आम्ही दोघ खुपच शहाणी झालो. मोठ्या आनंदाने दिवस जात असताना गेले संपूर्ण वर्ष माझ्या आजारात खर्ची पडले. तेव्हाही बाबांच्याच कृपेने मी माझे सर्व व्यवहार अगदी व्यवस्थित पार पाडत होते. आजारातून पूर्ण बरी झाले. आनंदाने मुलाची मुंज केली.

माझ्या यजमानानी मुंजीसाठी रजा घेतली. रजेवर असताना समजले की कंपनीचा संप सुरू झाला. कंपनी चांगली असल्यामुळे संप फारकाळ चालणार नाही असे वाटत होते. इच्छीले ते कधी सिद्धीस जात नाहीं. आज संप मिटेल, उद्या संप मिटेल असे वाटत होते. स्वतः माझे यजमान संप मिटविण्याचा प्रयत्नात होते. ऑफिसमध्ये असणारे मोठे मोठे अधिकारी येत होते. पण काही ना काही अडचणी येत होत्या. चार महिन्यानंतर सर्वपित्री अमावास्या 'गुरुवार' या दिवशी संप मिटल्याचे समजले. आश्विन महिन्याच्या पाडव्याला घट स्थापनेच्या दिवशी कंपनी सुरू झाली. आम्ही सर्वजण बाबांचे भक्त आहोत. त्यामुळे या चारही महिन्यात कोणत्याही प्रकारचा त्रास जाणवला नाहीं. मनावर अजिबात ताण नव्हता कारण दररोज सकाळी बाबा मला घरी येऊन सबूरीचा सल्ला देत होते. बाबांचे अस्तित्व क्षणोक्षणी, मनोमनी जाणवत होते. अशा कृपाळू बाबांचे भक्तावरील प्रेम साईलीलात प्रसिद्ध करण्याचे ठरविले आणि हो सांगायचे राहिले नेहमीप्रमाणे श्रद्धा व सबूरीचे फळ म्हणजे कंपनीत भरपूर फायदे मिळाले. संप शांतपणे यशस्वी झाला. असेच बाबांचे कृपाछत्र आम्हां सर्वांवर राहू दे. त्याचे चिंतन करण्याची बुद्धि शक्ती मिळो अशी साईचरणी नम्र विनंती आहे.

जो मजलागी अनन्य शरण ।
विश्वासयुक्त करी मद्भजन ॥
माझे चिंतन माझे स्मरण ।
तयांचे उद्धरण ब्रीद माझे ॥

◆ ◆ ◆

# ममा

(श्रीसाई परिवर्तन कथा)

–श्री. ग. रा. पालकर
२३३।२ दारुवाला चाळ, बाझार वार्ड
कुर्ला, मुंबई–४०० ०७०.

० भालचंद्र आज बराच उदास व अस्वस्थ होता. कालच्या गाडीच्या प्रवासात पळवून नेलेली त्याची ब्रीफकेस हे त्याच्या अस्वस्थतेचं कारण होत.

दिवसें–दिवस वाढणाऱ्या गर्दीमुळे, त्याचा प्रवास नेहमी सुखकर व्हावा, म्हणून ममा त्याला पहिल्या वर्गाचा पास काढून देत असे. कालच्या पावसाने बऱ्याच गाड्या रद्द झाल्या व पहिल्या वर्गाच्या डब्यातही तोबा गर्दी झाली. दुसरी गाडी निश्चित केव्हा येईल याची खात्री नव्हती. अन् त्या गाडीत गर्दी नसेल असेही सांगता येत नव्हतं. नाईलाज म्हणून दरवाज्यात उभं राहून त्याला प्रवास करावा लागला. गाडीने प्लॅटफॉर्म सोडताच वेग घेतला, आणि रेल्वे रूळाजवळ उभ्या असलेल्या एका तरुणाने छत्रीचा दांडा त्याच्या हातावर मारला अन् त्या अचानक हल्ल्याने त्याच्या हातातली ब्रीफकेस गळून पडली चोर–चोर म्हणून त्याच्या जवळ उभ्या असलेल्या साऱ्यांनी ओरड केली. गाडीची साखळी ओढली. पण वेगात असलेली गाडी, उभी राहीपर्यंत तो चोर सर्वांसमक्ष ती ब्रीफकेस घेऊन दूर–दूर पळत दृष्टीआड गेला.

ऑफिसला जायचा आज त्याला मूड नव्हता. पळवून नेलेल्या ब्रीफकेस मधल्या चीज–वस्तुंची तो आठवून आठवून जुळणी करू लागला. जेवणाचा डबा, छोटा टॉवेल, गेल्या वाढदिवसाला ममाने दिलेलं पारकर पेन. स्वतःच्या नावाचं लेटर पॅड, शंभर ते सव्वाशे पर्यंतची रक्कम, नुकतीच लिहिलेली कादंबरी, आणि ममाने ब्रीफकेसला चिकटवलेलं साईबाबांच सुंदर स्टिकर.

त्याच्या ममाला साईबाबांचं फार वेड, घरात कोणतीही नवीन वस्तु आणली की, त्याला साईबाबांच स्टिकर चिकटवायची तिला जणू संवयच झाली होती. भालचंद्राने तिला या बाबतीत एकदा छेडलंही होत.

"ममा! तू अगदी लहान मुलासारखं करतेस बघ. अग, नवीन आणलेल्या वस्तूला साईबाबांच स्टिकर चिकटवायलाच हवं का!"

"तस नव्हे रे भाल! माझी आपली एक श्रद्धा आहे. की, या वस्तूंचा बाबांनी स्वीकार करावा. कुणाचीही वाईट नजर यांवर पडू नये. याच सुरू-वातीच सौन्दर्य दीर्घकाळ टिकावं अन् ... अन् अत्र-तत्र सर्वत्र. बाबांच मंगल-मय दर्शन व्हावं. भाल! देवाला दाखविलेला नैवेद्य ग्रहण करतांना तो इतरत्र कोठे पडणार नाही, याची आपण काळजी घेतोच ना? तद्वत् या वस्तूंवर साईबाबांच चित्र पाहिल्यानंतर ती वस्तूही आपण काळजीपूर्वक हाताळू असं मला वाटतं"

ममाच्या या वक्तव्यावर तो काही बोलला नाही. किंवा तिच्या श्रद्धेला तडा जावा, असाहि तो कधी वागला नाही.

ममा ही भालचंद्राची आई, तिच मूळचं नाव ममता. पण तिचे यजमान तिला नेहमी ममा या लडिवाळ शब्दात हाक मारायचे. वडिलांचे हे बोल लहानग्या भालचंद्राने आत्मसात केले, आणि तेव्हापासून तो आईला ममा म्हणू लागला.

ब्रीफकेसमधल्या कादंबरीशिवाय इतर वस्तुचं भालचंद्राला सुख-दुःख नव्हत. त्या वस्तु आज ना उद्या केव्हाहि घेता येण्यासारख्या होत्या. पण कादंबरी? पंधरा दिवसाच्या अविश्रांत मेहनतीने लिहिलेली कादंबरी? पुन्हा जशीच्या-तशी केव्हा लिहून होणार? त्यातील लहान मोठे प्रसंग, समर्पकतेने वापरलेली उपमा-अलंकार पुन्हा जसेच्या तसे लिहिणं निव्वळ अशक्य प्राय होतं. ही कादंबरी तो स्वतः प्रकाशित करणार होता. त्याबाबत त्याने प्रेस मालकाशी बोलणीही केली होती. अन् पुढील आठवड्यात त्याच्या छपाईच काम सुरू होणार होत.

आदल्या दिवशी ममानं त्याला विचारलही होत, "भाल! झाली कारे तुझी कादंबरी लिहून?"

"होय ममा! शेवटच प्रकरण या एक-दोन दिवसात लिहीलं की देतोच तुला शुद्धलेखनाकरिता."

भालचंद्राने लिहायच अन् ममाने सुद्ध लेखनाच्या दुरुस्त्या करून ते आपल्या सुंदर टपोऱ्या अक्षरात शुध्द लिहायच हे ठरलेलं.

ममा एका मराठी माध्यमिक शाळेत मराठीची शिक्षिका होती. भालचंद्रापेक्षा तिचं शिक्षण अधिक झालं होतं. आपणापेक्षाहि मुलानं जास्त शिकावं ही तिची आंतरिक इच्छा. शिक्षणात रस नसलेल्या, सदैव वाचन व लेखनात निमग्न असलेल्या भालचंद्राला पुरी करता आली नाही. पण आपल्या लेखणीनं त्याने तिच्या मातृत्वपणाला उजाळा दिला होता. तिच जीवन कृतार्थ केल होतं.

वयाच्या अवघ्या बावीसाव्या वर्षात, भालचंद्राची आठ पुस्तके प्रकाशित झाली, आणि ती सर्वच्या-सर्व लोकप्रिय ठरली. कादंबरी हे त्याच नववं पुस्तक ममा त्याच्या लेखनावर बेहद्द खुश असायची. त्याची ओघवती भाषाशैली, सुंदर व अप्रतिम अशी लेखन मांडणी, मनाची पकड घेणारी वाक्यरचना. अन् शब्दागणिक दिसून येणारी त्याची प्रतिभा. त्याच्या भविष्यकाळातील उज्वल यशाची तिला आतापासूनच चाहूल लागली होती. गेल्या वर्षी त्याच्या कथा संग्रहाला पुरस्कार देखील मिळाला होता. पुरस्कार प्रदान समारंभास भालचंद्राने ममाला मुद्दाम आपल्याबरोबर नेल होत. तेव्हां त्याच्या विषयीचे निर-निराळ्या वक्त्यांचे विचार ऐकून. तिला आपल जीवन कृतकृत्य झाल्यासारख वाटल. आज भालचे वडील असते तर? ... तर? एक अनामिक संवेदना तिच्या सर्वांगात तेव्हा चमकून गेली होती.

ब्रीफकेस हरवल्याचं जेव्हां ममाला कळलं तेव्हां तिला फार वाईट वाटले. भालचंद्राला जवळ घेत. "भाल! जशी बाबांची इच्छा" अस म्हणत फक्त चार शब्दात तिने त्याच सांत्वन केल.

एक-दोन आठवडे भालचंद्राच चित्त ठिकाणावर नव्हतं. त्यान ब्रीफकेस पळविणाऱ्या चोराचा खूप शोध केला. तक्रार नोंदविलेल्या पोलीस ठाण्यावर चौकशी केली. पण चोर अद्याप सापडला नव्हता. त्याने पुन्हा लिहायचा प्रयत्न केला. परंतु पूर्वीसारखे शब्द जुळून येत नव्हते.

एकदा ऑफिसमधून भालचंद्र घरी येताच ममान त्याला सांगितलं,

"भाल! त्या साव्यांना म्हणे अ‍ॅटॅक आला."

"काय म्हणतेस काय, ममा?"

"होय रे! या सायंकाळमध्ये तस दिलय खरं, असं म्हणत ति ने तो सायंकाळचा अंक त्याच्या हातात दिला. त्यात बातमी होती.

"मुंबईतील सुप्रसिद्ध गिरीजा प्रकाशन संस्थेच्या श्रीरंग प्रेसला आज सकाळी दहाच्या दरम्यान आग लागली. कागदपत्रांसह अत्याधुनिक मशिनरीही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. सदर आगीचेवृत्त समजताच प्रेसचे मालक श्री. सावे यांना अॅटॅक आला असून, त्यांना जवळच्या दवाखान्यात दाखल केले आहे. आगीचे कारण समजू शकलं नाही."

"भाल! व्हायची गोष्ट टळत नाही हेच खरं, तुझ्या कादंबरीच लिखाण चोरीस गेल नसत, तरी ते आज साव्यांच्या प्रेस मधल्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं असत. जशी बाबांची इच्छा" अस म्हणत एक दीर्घ सुस्कारा सोडीत, ममा भालचंद्राला चहा आणण्याकरिता स्वयंपाक घराकडे वळली.

बरेच दिवस निघून गेले. एके दिवशी भालचंद्राच्या नावाच एक भलं मोठं पार्सल आलं. त्याने ते फोडून पाहिल, त्यात त्याची पळविलेली ब्रीफकेस होती. आश्चर्याचा सुखद धक्का त्याला बसला. त्याने ती उघडून पाहिली तेव्हा त्याल साईबाबांच स्टिकर सोडून, सर्व वस्तु जशाच्या तशा होत्या. कादंबरीला जोडून एक पत्र होते. त्याने ते पत्र वाचायला सुरवात केली.

सविनय नमस्कार, वि. वि.

दोन महिन्यापूर्वी पळवून नेलेली आपली ब्रीफकेस व त्यातील वस्तु मी आपणास परत पाठवित आहे. ब्रीफकेस पळविल्याबद्दल आपणास शारीरिक व मानसिक क्लेश जरूर झाले असतील, त्याबद्दल क्षमस्व.

तसा मी काही चोर नाही पण परिस्थितीमुळे हे सारे करावे लागले. डिग्रीचं प्रमाणपत्र मिळवूनसुद्धा नोकरीची तहान कुठे भागली नाही, तेव्हां नाईलाज म्हणून, अंगावर पडलेल्या जबाबदारीमुळे मला हा उद्योग करावा लागला.

त्या दिवशी आपली ब्रीफकेस पळवितांना मलाही अतिशय दुःख होत होत. पण पोटात उठलेला आगीच डोंब भावनेच्या निर्जिव शब्दांनी शांत होत नसतो.

आपल्या ब्रीफकेसीवरच साईबाबांचं स्टिकर मला अत्यंत आवडलं. वाटेत असलेल्या एका लॉटरी सेंटरमधून साईबाबांच चित्र असलेलं लॉटरीच्या तिकीटाच एक पॉकेट, आपल्या ब्रीफकेस मधल्या पैशांनी खरेदी केलं. अन् त्यातल्या एका तिकीटाला पन्नास हजार रुपयाच बक्षिस लागलं. त्यामुळे मना-विरुद्ध लागणाऱ्या उद्योगाची समाप्ती झाली.

गेल्या आठवड्यात आम्ही सहपरिवार शिरडीला गेलो तेव्हा तेथे मला आपली ब्रीफकेस आपणास पाठविण्याची प्रेरणा झाली. तद्नुसार आपल्या लेटर पॅडच्या पत्त्यावर आपली ब्रीफकेस पार्सलने पाठवित आहे.

आपलं साईबाबांच स्टिकर मी नित्य पूजेसाठी ठेवून घेतलं आहे. ब्रीफकेस मधल्या लिखाणावरून आपण लेखक असल्याच कळलं. तेव्हा माझ्या या पत्राहून अधिक माझी आंतरिक भावना आपण जाणून घ्याल अशी आशा करतो.

आपला
साई–स्नेही

ब्रीफकेस मिळाल्याच्या अत्यानंदात भालचंद्र जवळ–जवळ ओरडलाच, "ममा! ममा!! तुझा साईबाबा पावला गं! खरच पावला." अन् हातातलं पत्र देवघरात साईस्तोत्र म्हणत असलेल्या ममाला देत त्यानं बाबांच्या तसबीरी-पुढे अक्षरशः लोटांगण घातलं.

# कल्पवृक्षाच्या छायेत

—श्री. वसंत वामन प्रधान
श्रीगणाधीराज को. ऑ. हाऊसिंग
सोसायटी लि. बि. नं. २, ब्लॉक नं. ९२,
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१

० सांसारिक जीवनात अनेक माणसे अगदी एकमेकाजवळ येतात. भावनिक दृष्टया एकमेकाशी समरसतात व कारणपरत्वे एकमेकापासून दुरावतात क्वचित पत्ररूपाने किंवा भेटीगाठीने त्यांचे दुवे सांधले राखण्याचा प्रयत्न केला जातो किंवा एकमेकांच्या स्मृतीपटलावर ते केव्हांतरी डोकावतात. नियतीने ऋणानुबंधाचे धागेदोरे विणलेले असतात; म्हणूनच संकलित जीवनपटावरचे मानवी प्यादे पुढे मागे सरकत असतात. श्रीसाईसच्चरितामध्ये बाबांनी म्हटले आहे येथे नाही कोणी–कुणाचे "नग्न आलो नग्न जायाचे" उदी हे त्याचे स्मारक. श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना मानवी जीवनाची अंतीमता व क्षणभंगुरता किती सहज समर्पक सांगितली एखादे तत्त्वरकाने भरून लिहिले तरी ते गळी उतरत नाहीत परंतु श्रीबाबांनी अध्यात्म सोप्या भाषेत सोपे दृष्टांत देवून पटविले. काही प्रसंगी व्यक्तिच्या अधिकारानुरूप अलौकिक गूढ प्रसंग स्वतःचे ठिकाणी दाखविले व श्री बाबांची विश्वासी असणारी एकात्मता प्रत्ययास आणली. उदाहरणार्थ श्रीसंत दासगणूमहाराजांचे स्थान बाबांच्या आवडत्या भक्तात बरेच निकटचे आहे. येथे एक गोष्ट नमूद करणे अवश्य आहे की त्यांचे जवळ सर्वांठायी समभाव होता. तरी अपवादात्मक कै. माधवराव देशपांडे (शामा) हे जास्त जवळचे. श्रीसाईसच्चरित :– असेल माझा शामा खुळा परी मजला तयाचा लळा हे बाबांचे उद्गार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. श्रीसाईबाबा हे शामाचे जीवन सर्वस्व होते. शामाला बाबांमध्ये फक्त देवच दिसला, तर ज्ञानीभक्त श्री संत दासगणू महाराजांना बाबांमध्ये परब्रम्हाचा साक्षात्कार घडला. श्रीविठोबाचे वारकरी भागवत धर्माचे उपासक श्री दासगणू महाराजाना शिरडीत पंढरपूर दिसले व श्री साईबाबांनी त्यांना विठ्ठलरूप दाखविले म्हणूनच चोखंदळ व सत्यशोधक श्रीदासगणूंनी 'शिरडी माझे पंढरपूर साईबाबा रमावर' असे म्हटले आहे. प्रस्तुत लेखकाचे श्री दासगणू महाराज अध्यात्मिक गुरु असल्यामुळे शिरडी व बाबा माझ्या जीवनाचे अविभाज्य भाग झाले. गत स्मृतींचा आठव हा जीवनाचा विरंगुळा आहे तो आनंद शब्दातीत आहे 'आता स्मृतीने नीर पाझरते मम नयना मधले, अनादी

साई सर्व साक्षी तू सर्व जरी गेले, तुझ्या कृपेने जीवन माझे अथांग भरले, 'वनंत' वहरो भक्ती रसाने मम हृदयी स्फुरले, मागील काळांतील माझे अनेक गुरुबंधू ह्या कल्पवृक्षाच्या छायेत विसावले. जीवनाची कक्षा ओलांडून मोक्षाच्या मार्गात गेले, माझी पावले मात्र प्रतिक्षा मार्गावर वाटचाल करीत आहेत. मानवी जीवन नियतीच्या संकेतानुसार चालते, आधार एकच सद्गुरुचा सद्गुरु व देव एकच. श्री सद्गुरु साईनाथ महाराजांच्या चरणाजवळ आपल्या जीवनाची सांगता व्हावी. हे पुरातन चरण साधकाचे सिद्ध करुन जन्माचे मूळ नाहीसे करतात. मला सद्गुरु कृपेने संगतीचा लाभ घडला, मांझ्या जीवनाला त्यांचा अगदी जवळचा स्पर्श झाला. त्यांचा उल्लेख अस्थानी होणार नाही. श्रीसंत गाडगे महाराज, सोनगीरचे ब्रम्हचारी संत केशवदत्त महाराज, सावंतवाडीचे सावंत महाराज (साटम महाराजांचे शिष्य) शिरडी संत अब्दुल्ला (श्री साईबाबांचे सेवेकरी) म्हाळसापती इ. एकदा बरेच वर्षापूर्वी शिरडीत मला जोराचा दमा सुरु झाला. तेव्हा अब्दुल बाबांनी चिमूटभर उदी मला बाबांची प्रार्थना करुन दिली व म्हणाले तेरेकु बाबा अच्छा करेगा. चमत्कार म्हणजे उदी तोंडात टाकताच दोन सेकंदात दमा बंद झाला. श्री बाबांनी अब्दुल्लाचे ऐकले कारण संत कसे असतात तर 'नम्र झाला भूता त्याने कोंडिले अनंता' किंवा जैसे सबाह्य नवनीत तैसे सज्जनांचे चित्त. येथे मी संतांचा ओझरता उल्लेख केला. मानवी जीवनात संत समागम घडल्यास जीवन समृद्ध होते, सत्संगाने सद्वृत्तीचा परिपोष होतो, मनाचे चंचलपण कमी होते. कृष्णाने अर्जुनाला तुझे आणि माझे किती जन्म झाले ते मी जाणतो परंतु तें जाणत नाहीस असे म्हटले त्याचप्रमाण आमचे किती जन्म झाले किती जन्म होतील परंतु ह्या जन्मातला हा जमलेला डाव हा भक्तीसंगम पुन्हा होणार नाही. राम अवतारानंतर कृष्ण अवतारातील चमत्कृतीजन्य कथा मनाची पकड घेतात, परंतु तोच योगेश्वर कृष्ण शिरडीत पुन्हा अवतरुन आपले मोठेपण विसरुन सारे पूर्वजन्म परिचित लोक प्रेमाने जवळ घेतले त्यांचा उद्धार केला, व आज आम्ही कुठे होतो माहित नाही. परंतु श्री साईरामकृष्णाच्या भक्ती रसांत डुंबत आहोत हे आमचे केवढे भाग्य त्या पुरातन कल्पवृक्षाच्या छायेत, मी ज्ञानेश्वर माऊलीच्या पसायदानातील दोन ओव्यांचा भावार्थ प्रसाद रुपाने मागतो तो सर्वांना मिळो हीच माझी प्रार्थना.

**दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।**
**जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात॥२॥**

# साई समर्थ

–श्री. अरविंद बारटक्के
१२५, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

धन्य तोचि देश जेथे संतवास ।
तापत्रय दोष जाती सत्य ।।

श्रेष्ठ श्री नामदेव महाराजांनी म्हटले आहे ते यथार्थच आहे. आपली भरतभूमी पुण्यवान म्हणून थोर संत इथे जन्माला आले. खरे संत लोकांच्या कल्याणासाठी, दीनांच्या उद्धारासाठी, देशाच्या उत्कर्षासाठी आपले सर्वस्व अर्पण करतात. काम, क्रोध, लोभ मत्सरावर अंकूश ठेवून लोकांना सुखाचा मार्ग दाखवितात तर दु:ख स्वत:चे पदरी घेतात.

श्रीसाईबाबा हे असेच महान संत. तुकाराम, नामदेव, गोरा कुंभार आदींनी भक्तीमार्गाचा अंगिकार करुन वैष्णव धर्माची महती गात लोकांना उपदेश केला. तर साईबाबां सारख्या थोर योगी पुरुषाने सामान्यात राहून आपले असामान्यत्व प्रगट केले. लोकांच्या दु:खाचा अंगीकार करुन आपल्या भक्तांच्या अडीअडचणी, दुःख, समस्या दूर केल्या.

साईंचे जीवन म्हणजे असामान्यत्वाचा एक आविष्कारच आहे. भिक्षा मागून आणलेले अन्न त्यांना चाले. सामान्य जनांची भाकरी त्यांना प्रिय. शरीर झाकण्यासाठी वस्त्र म्हणून कफनी तर निवाऱ्याला मशिद. त्यांना कशाचा लोभ नव्हता. केवळ मनुष्यदेह धारण केला म्हणून त्याचे (मनुष्य देहाचे) उपचार पाळायचे एवढेच महत्वाचे.

सामान्य जनांचे दुःख पाहून साईचे अंत:करण दु:खी होई व त्यांचे दु:ख स्वत: घेऊन साई त्यांचे निवारण करीत. गावात मरीची साथ आली म्हणून गहू स्वत: दळून पीठ वेशीवर पसरणे, दुरच्या भक्ताचे मूल (लोहाराचे मूल) अग्नीत पडले तेव्हां स्वस्थानी बसून समोरील अग्नीत हात घालून मूल वाचवणे

हे सर्व साईंचे भक्तांवरील प्रेम, त्यांचे दुःख निवारण्याची कळकळ व त्यासाठी स्वतः सोसलेली झळ दिसून येते. म्हणूनच साई हा आपला सर्वांचा वाटतो आणि मग अशावेळी –

साई नाही तुमचा वा आमुचा । तो तो सर्व भूतस्थ साचा ।।
सूर्य जैसा सकल जगाचा । हा सकळांचा तैसाच ।। अ १९ ।। १३९ ।।

याचे प्रत्यंतर येते.

साई आपल्या भक्तांकडून दक्षिणा मागत. काहीवेळा ते एखाद्याकडे सतत दक्षिणा मागत की सरतेशेवटी त्याच्याकडे काही उरत नसे. त्याचप्रमाणे साई कोणाचे कष्टही फुकट घेत नसत. घरावर शिडी लावून देणाऱ्यासही नाणी देत. दान करीत. यावरुन प्रत्येकाने आपल्याजवळ पुरेसे असल्यावर अधिकाचे गरज-वंतास दान करावे हीच शिकवण दिसून येते. नाहीतर देवस्वरूप साई समर्थास इहलोकीच्या सोन्यारूप्याच्या नाण्याचे काय महत्त्व? दान दिल्याने वाढते. पुण्य लागते व यासाठी विपुल असणाऱ्यांनी गरीबांना, दीनदुबळचांना दान करावे हाच उपदेश साईबाबांचा होता, अर्थात कोणतेही दान सत्पात्री असावे हे निश्चितच.

थोर संतपुरुषांची वचने त्यांचे जीवन हे युगानयुगे आदर्शभूत ठरते. त्यांची शिकवण, उपदेश, चीरकालिन अभंग असतो. त्यामागची सद्भावना उत्साहास प्रेरणा देणारी असते. श्रद्धा आणि सबुरी ही साईंची दोन वचनं. या दोन शब्दात किती अर्थपूर्ण उपदेश एकवटला आहे ते अर्थ जाणून घेतल्यास खचितच उमजेल. श्रद्धा ही जीवनात आवश्यक आहे. तिचे स्थान अनन्य-साधारण आहे तर सबुरीने वागल्याशिवाय जीवन कसे यशस्वी होईल? यशस्वी जीवनात या दोन मूल मंत्राचा समावेश नसेल तर ते जीवन सफल होणारच नाही.

अशी ही दीनांची माऊली, भक्तांची साऊली साई – तिचे गुणगान तरी किती करावे? शब्द अपुरे पडावेत. लेखणीला मर्यादा यावी असे ज्याचे व्यक्तीत्व त्या साईवर कळत नकळत भक्ती जडते. कितीकदा दर्शन घेवून नयनांची तृप्ती

होत नाही तेव्हा ते रूप हृदयात साठवावे लागते. मन, हृदय भक्तीभावाने भरून येते व अशावेळी वाटते –

**साईचरणी अत्यंत भक्ती । नयनी कोंदो साईमूर्ती ॥**
**साईच दिसो सर्वांभूती । ऐसी ही स्थिती भक्ता येवो ॥ अ ५२ ॥३९॥**

टीप :– अ. १९ ओवी १२९ व अध्याय ५२ ओवी ३९ या दोनही ओव्या श्रीसाईसच्चरित ग्रंथातील आहेत.

# श्रध्दा हेच जीवन

**श्री. सुरेश दत्तात्रय कुलकर्णी**
द्वारा द. ना. सिरूर बालकाश्रम,
४०, प्रार्थना समाज रस्ता,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७.

० विज्ञानयुगात मानवाने आपल्या बुद्धीच्या आणि प्रयत्नाच्या जोरावर अनेक नवनवे शोध लावले आहेत की ज्यापुढे आपली कल्पनाशक्तीही थिटी पडावी. मानवाने वैज्ञानिक शोधांचा उपयोग करून आपले जीवन सुखी आणि समृद्ध करण्याचा प्रयत्न चालविला आहे. वैज्ञानिक शोधामुळे मानवाचे जीवन सुखमय वाटत असले तरी तो सुखी आहे काय? असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर दुर्दैवाने नाही असेच द्यावे लागेल. विज्ञानामुळे ऐहिक सुखे जरी मानवाला मिळत असली तरी तो पारमार्थिक सुखाला पारखा होत चालला आहे हे नक्की. केवळ प्रगती हीच सुख शांतीची फूटपट्टी असती तर अमेरिका, रशिया व इतर प्रगत देशातील लोक गळयात रुद्राक्षाच्या माळा, अंगावर भगवे

कपडे आणि डोक्याचा चकोट करून मनःशांतीच्या शोधात हजारो मैल धड-पडत आले नसते आणि भारतभर तिर्थस्थानांच्या क्षेत्री फिरले नसते.

माणसाला सुखी व्हावयाचे असेल तर प्रगती, संपन्नता हीच आवश्यक अंगे नाहीत तर इतरही अनेक गोष्टी आहेत. उदा. श्रद्धा पूर्वीच्याकाळी मातृदेवो भव, पितृदेवो भव अशी लोकांची श्रद्धा होती, विचार होता. आता श्रद्धा-स्थानेच नष्ट व्हावयास लागली आहेत. माणसांच्या अंगी श्रद्धा असली की श्रद्धेनंतर भक्ती आणि भक्तीने शांती आणि नंतर मोक्ष मिळू शकेल.

सध्या मानवाचा कल वास्तवतेवर फार आहे. एखाद्या गोष्टीवर जर त्याची श्रद्धा बसावयास हवी असेल तर ती गोष्ट प्रयोगाअंती सिद्ध व्हावी लागते, प्रत्यक्ष पहावयास आणि अनुभवावयास हवी असते. म्हणजेच "बाप दाखव नाही तर श्राद्ध घाल" अशी मनोवृत्ती. साईलीला मासिकातून साईलीलाचे लेखक त्यांना जे जे अनुभव येतात किंवा चमत्कार होतात ते अनुभव किंवा चमत्कार साईलीलातून लिहितात. त्यामुळे ज्या गोष्टी प्रत्यक्षात घडतात किंवा जनसामान्यांना जे अनुभव येतात त्याचेच वर्णन त्यात असल्याने त्या गोष्टी साईवर श्रद्धा ठेवण्यास आणि साईवरील विश्वास दृढ होण्यास कारणीभूत ठरतात असे मला वाटते.

साईचरणी श्रद्धा ठेवल्यावर काय किमया घडते हे सर्व साईभक्तांना माहित आहे. प्रत्यक्ष माझेच उदाहरण देत आहे.

माझी वहिनी करमाळा येथील कॉटेज हॉस्पिटलमध्ये इन्चार्ज सिस्टर म्हणून काम करते. त्यांची बदली पंढरपूर येथील कॉटेज हॉस्पीटलमध्ये करण्यात आली होती. पंढरपूर येथे नर्सेसला रहायला क्वॉटर्स नाहीत. घरात लहान लहान चार मुली, वयस्क सासू, पती करमाळ्याजवळ १५–१६ मैलावरील एका खेड्यात एका हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक, अशा परिस्थितीत बदली रद्द होणेच आवश्यक होते. हॉस्पिटलमधील त्यांचे कामही चांगले. म्हणून गावातील जनतेने आपल्या शेकडो सह्यांचे निवेदन आरोग्य खात्याकडे पाठवून बदली रद्द करण्याची मागणी केली होती. परंतु बदली आकसानेच केलेली असावी म्हणून बदली रद्द करण्यास आरोग्य खात्याकडून नकार घंटा मिळाली. आता काय करावे? असा गंभीर प्रश्न उभा राहिला होता म्हणून माझी भावजय आणि भाऊ माझ्याकडे मुंबईला

आले. मुंबईला आल्यानंतर आरोग्य मंत्र्यांना भेटून बदली रद्द करण्याविषयी विनंती करावयाची असे ठरले त्याप्रमाणे अर्जही लिहिला. माझ्या सचिवालयात काही ओळखी आहेत त्यांची मदत घेऊन हे काम करण्याचे ठरले म्हणजे सुतावरून स्वर्ग गाठावयाचा असाच प्रकार. आम्ही सचिवालयात गेलो, आरोग्य-मंत्र्यांना भेटलो अर्ज दिला तो वाचून त्यांनी संध्याकाळी ५–०० वाजता भेटा अशी सूचना केली. आम्ही ५ वाजेपर्यंत सचिवालयातच थांबलो आणि ६ वाजे-पर्यंत वाट पाहिली परंतु त्या दिवशी कॅबिनेट मंत्र्यांची मिटिंग असल्याने आरोग्यमंत्री सचिवालयातच आल्या नाहीत म्हणून दुसरे दिवशी परत गेलो जाताना माझ्या घरातील साईच्या फोटोसमोर उभा राहून मी साईला प्रार्थना केली की, हे साई माझी तुझ्यावर नितांत श्रद्धा आहे तेव्हां या माझ्या श्रद्धेला तडा न जाण्यासाठी तू माझ्या बहिणीची बदली रद्द करण्याची किमया करून दाखव आणि आमच्या कुटुंबावर आलेले संकट निवारण कर. असे म्हणून उदबत्ती ओवाळली. नमस्कार केला.

मी ज्या फोटोसमोर उभा राहून साईची प्रार्थना केली तो फोटोसुद्धा मला चमत्कारानेच मिळालेला आहे त्याचे असे झाले मी जून १९८३ च्या अंकात "चमत्काराशिवाय नमस्कार नाही" हा लेख लिहिला होता. तो अनेक साईलीला वाचकांना आवडला अनेक ठिकाणाहून चांगल्या अभिप्रायाची पत्रे आली त्याचपैकी एक पत्र श्री. पु. कृ. धुपकर, यांचे

मी पूर्वी नास्तीकत्वाकडे झुकलेला होतो त्यामुळे नंतर मी जरी साईभक्त झालो तरी साईने माझ्या घरी स्वतः होऊन यावे घर त्यांचेच आहे मात्र मी त्यांना आणणार नाही अशा विचाराने साईचे कोणतेही छायाचित्र किंवा मूर्ती घेतलेली नव्हती.

मी एकदा दुपारचा असाच वामकुक्षी घेत असताना दारावरची बेल वाजली म्हणून मी उठून दार उघडले तर दारात दोन अनोळखी चेहरे दिसले तसे मी संस्थाप्रमुख असल्याने मला भेटावयास किंवा संस्थेस भेट द्यावयास अनेक लोक येतच असतात परंतु मला पाहिल्याबरोबर ओळखले का? असा प्रश्न त्या दोन अनोळखीपैकी एकाने केल्याने मी जरा डोके खाजवू लागलो परंतु काही आठवेना! तेव्हा त्या व्यक्तीनेच आपली ओळख करून दिली की मी धुपकर आणि हे माझे स्नेही श्री. नाचणे आम्ही दोघेही साईभक्त आहोत आम्ही

तुमचा साईलीलामधील लेख वाचला तो फार आवडला म्हणून भेटावयास आलो आहोत. मी त्या दोघांना घरात घेतले त्यांचे आदरातिथ्य केले. श्री. चुपकर यांनी केवळ साईकृपेने त्यांचे जीवन कसे सफल झाले ते सांगितले; आणि हा फोटो तुमच्यासाठी भेट म्हणून आणला आहे असे म्हणून माझ्या हाती फोटोचे पॅकेट दिले त्यांच्या या कृतीने मी जरा चक्राऊन गेलो कारण माझ्या इच्छेप्रमाणे साईने फोटोच्या स्वरूपात स्वतः होऊन आणि तेही एका निस्सिम साईभक्ताच्या हस्ते आगमन केले होते नंतर मी त्यांचेच हस्ते साईची स्थापना केली हार घातला, उदबत्ती ओवाळली असा तो फोटो.

आम्ही साईची प्रार्थना करून घराबाहेर पडलो त्या दिवशी आरोग्यमंत्री सचिवालयात भेटले नाहीत म्हणून विधानसभा भवनात गेलो आणि आम्ही आरोग्यमंत्र्यांच्या कार्यालयात जाणार तेवढ्यात डॉक्टर ललिता राव यात्र त्यांचे काम संपवून बाहेर निघाल्या होत्या. त्यामुळे त्यांना दरवाजात अडवून बोलणे योग्य नव्हते म्हणून परत सचिवालयात आलो आणि काय आश्चर्य त्यांनी त्याच दिवशी बदली रद्द करण्याचा आदेश आरोग्यखात्यास दिला. आमच्या आनंदास पारावार राहिला नाही. आमच्या घरात मी एकटाच फक्त साईभक्त होतो. पण साईवर ठेवलेल्या श्रद्धेमुळे आणि बदली प्रकरणाच्या चमत्कारामुळे माझा भाऊ आणि भावजय यांचाही विश्वास बसला आणि तेही साईभक्त झाले. घरी परत येताना त्यांनी साईसाठी मोठा हार, प्रसादासाठी पेढे घेतले आम्ही घरी आल्यावर मनोभावे पूजा केली आणि पेढ्याचा प्रसाद वाटून आमचा आनंद व्यक्त केला. मी भावाला एकदा शिरडीस सवडीने जाऊन या असा सल्ला दिला तो उभयतांनी आनंदाने मान्य केला. साईचरणी श्रद्धा ठेवल्यावर अशक्य ते शक्य करून दाखविण्याची किमया साई करून दाखवतात हेच खरे.

साईलीलाच्या वाचकास नम्र विनंती की आपण साईचरणी श्रद्धा ठेवा त्यांची मनोभावे भक्ती करा तेच आपणास संकटसमयी तारतील याची खात्री बाळगा.

★

# साईनाथा तुझी सेवा सतत घडो

—श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
"रघुनाथ निवास" चेंबूर, गावठाण १
मुंबई ४०० ०७१

जयाचेनिनामे महादोष जाती
जयाचेनिनामे गती पाविजेती
जयाचेनिनामे घडे पुण्य ठेवा
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥

० मर्यादा पुरुषोतम श्री. प्रभू रामचंद्रांनी शबरीला जो उपदेश केला त्यावेळी त्यांनी सांगितले.

पुंस्त्वे स्त्रीत्वे विशेषो वा जातिनामाश्रमादयः
न कारणं मम्दजने भक्तिरेव हि कारणम्

'पुरुष, स्त्री, हा विशेष, किंवा जाति, नाम, आश्रम इत्यादी गोष्टी माझ्या भजनाला—सेवा करण्याला— कारण होत नाहींत त्याकामी भक्ति हेच एक साधन आहे. आता असा प्रश्न उत्पन्न होतो की — भक्ति म्हणजे तरी काय? त्याचे थोडक्यात उत्तर प्रभुनी दिलेले आहे.

स्त्रियो वा पुरुषस्यापि तिर्यग्योनिगतस्य वा
भक्तिः संजायते प्रेम लक्षणा शुभ लक्षणे ॥

पुरुष असो, वा स्त्री असो, किंवा पशुपक्षिकोटीतील असो, त्याच्या ठिकाणी माझी भक्ती जडते. हे शुभ लक्षणे । प्रेम हे त्या भक्तिचे लक्षण होय. आपले अंतःकरणात श्रीरामांविषयी श्रीसाईरामा विषयी प्रेमाची ओढ पाहिजे मग बाकीची साधने नियम फिके पडतात..

प्रेम आणि स्वार्थ हे एकमेकांपासून विरुद्ध असे शब्द आहेत. प्रेमात स्वार्थाची अपेक्षा नसते. स्वार्थापोटी केलेले प्रेम, हे प्रेम राहू शकत नाही.

व भगवान त्याने बांधला जात नाही प्रेमापुढे बाकीचे नियम कसे फोल ठरतात याबद्दल 'रामायणांतील श्री समर्थ साईचरित्रातील व 'श्रीसमर्थ रघुनाथ महाराज धोपेश्वर यांचे चरित्रातील थोडासा भाग देत आहे.

(१) भगवंताला जी वस्तू अर्पण करावयाची तीचा स्वाद प्रथम भक्तांने घ्यावयाचा नसतो. शुचिर्भूत होऊन पवित्र मनानें भगवंताकडे जाऊन मग ती वस्तू त्याचे चरणावर अर्पण करावयाची पण शबरीने प्रथम बोरे खाऊन मग ती प्रभूला दिली यात तिच्या प्रेमाची साक्ष जास्त होती. चुकूनही आंवट बोर जाऊ नये त्याचप्रमाणे रसाने भरलेले असे असावे अशी तिची अंतःकरणापासून श्रद्धा होती म्हणून त्या उष्टया बोराची चव अमृताहून आगळी अशी श्रीरामाना वाटली.

(२) डिसेंबर १९१५ मध्ये श्री बाळाराम मानकर परलोकवासी झाले. त्यांचा मुलगा क्रियाकर्मांतर करण्याकरिता म्हणून शिर्डीला निघाला होता. वांद्याला (वांद्रा) श्री बाळासाहेब तर्खड यांना भेटून त्याने शिर्डीला जात असल्याचे कळविले. श्री. बाबासाहेब यांचे कुटुंबाला काहीतरी श्री बाबांना द्यावे असे वाटले. घरात फिरून पाहिले परंतु काही मिळेना शिवाय मुलाला थांबण्यास वेळ नव्हता. जाण्याची घाई होती. अशा हृचात तिला एक पेढा खाल्लेल्या पेढयातील शिल्लक मिळाला. मुलगा सुतकी, शिवाय पेढा अशा दुःखीत माणसाबरोबर देणे अनुचित. परंतु हा विचार करावयास तिला वेळच नव्हता. इतके प्रेम भरून आलं की माझे घरुन बाबांकडे जाणारा इसम रिक्त हाताने जाता कामा नये. तिने तो पेढा बाबांना द्यावयास दिला. पुढे मुलगा शिर्डीला आला व आपले काम झाल्यानंतर श्री बाबांचे दर्शनाला गेला. मात्र तो पेढा नेण्यास विसरला. पेढा बिऱ्हाडी राहिला होता. प्रथम श्री बाबा काहीं बोलले नाहीत मात्र पुढे परत रिक्त हाताने दर्शनाला आल्यावर श्री साईमहाराज म्हणाले "त्वां मजसाठी काय आणिले? श्री. गोविंद मानकर म्हणाले, "काही नाही! अरे असे कसे? तू घराहून निघताना आईने खाऊ दिला होता ना? तेव्हा त्यांना पेढयाचे स्मरण झाले ते धावत धावत घरी आले व पेढा घेऊन दरबारी गेले व तो पेढा श्री बाबांचे हातावर ठेवला भक्तिप्रेमाने भिजलेला तो पेढा चटकन श्रींनी मुखात घातला व संतोषाचा ढेकर दिला

(३) पीरवाडी येथे श्री समर्थ रघुनाथ महाराज धोपेश्वर उर्फ काका पुराणिक यांचा सहा महिने मुक्काम होता. त्यावेळी तीर्थक्षेत्राप्रमाणे भक्तांची

गर्दी सुरू झाली असाच एक भक्त तेथे रहावयास आला होता. ह्या भक्ताला अकस्मात तार आली. त्याचा पुतण्या वारला होता. सबब त्याला घरी बोलाविले होते. ही हकीगत श्री महाराजांना सांगून निरोप घ्यावा म्हणून तो श्री काकांजवळ आला. श्री. काका पुराणिक त्यावेळी आंघोळ करीत होते. त्याने ही हकीगत त्यांचे कानावर घातली, व प्रार्थना केली की महाराज मला चरणाला हात लावून डोके ठेवून मग जाण्याची आज्ञा द्यावी. सुतकात देवाला शिवत नाहीत. फार काय देवळातही जात नाहीत. श्री काकांचा आचार श्री. टेंब्येस्वामींप्रमाणे कर्मठ होता. तथापि त्यांची श्रद्धा, प्रेम पाहून श्री काकांनी चटकन दर्शन घे म्हणून आजूबाजूला पाहून सांगितले त्याने चटकन् दर्शन घेतले. परंतु त्यावेळी श्री. नेनेशास्त्री तेथे आले व त्यांना हे दिसले व त्यांनी हा भाग चरित्रात लिहिला. श्री काकांवर त्या भक्ताची पूर्ण श्रद्धा होती. त्या समयाला श्री काकांची तब्येत खालावत जात होती. फिरून दर्शन मला घडेल की नाहीं हा भरवसा नव्हता. त्यावेळी सर्व नियमांचा विसर होऊन घट्ट चरण कधी धरीन हेच त्याचे अंतःकरणात होते. अशी त्याची स्थिती पाहून त्याला दर्शन घेण्यास श्री. काकांनी अनुमती दिली. अशा ह्या सर्व गोष्टींचा विचार करता प्रेमाशिवाय इतर सर्व साधने परमार्थात तोकडी पडतात हेच सिद्ध होते म्हणून त्या श्रीसाईरामाला एवढीच प्रार्थना की आमचे अंतःकरणांत अशी भक्ति निर्माण व्हावी व तुझी सेवा घडावी ही प्रार्थना.

---

# दिव्यानुभूती

—सौ. सीता कुलकर्णी, एम्. ए. बी. एड.
१३५३, अनंत बंगला, नातू बाग,
शुक्रवार, पुणे २.

० १९७५ जुलै महिना. उद्या मी शिरडीस जातोय. यायचय का तुम्हांला? असं सहज बसायला आलेले संतोष उदबत्तीवाले श्री. लिमये म्हणाले. माझ्या मनात बालपणापासूनच शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घेण्याची इच्छा होती. आणि "सत्यसाई सच्चरित" लिहिण्याचा मला संदेश मिळाला होता. लेखनास सुरवात करण्यापूर्वी 'श्रीसाईसच्चरित' या ग्रंथाची सात पारायणे करावित अशी

ही आज्ञा मला झाली होती. त्या आज्ञेनुसार मी सदर पारायणे सुरू केली होती. लिमयांचे सहजासहजी निमंत्रण म्हणजे श्रीसाईबाबांचा संदेशच मला वाटला. मी त्वरीत हो म्हणाले, आणि दुसऱ्या दिवशी पुणे शिरडी गाडीने शिरडीस गेलेही. बरोबर श्री. कुलकर्णीही होतेच. श्री. लिमये नियमित शिरडीस जातात. ते परम साईभक्त आहेत. त्यांना शिरडी देवस्थानातील सर्व माहिती उत्तम आहे. शिरडीस जाताना प्रथम त्यांनी खोली निवास करण्याकरिता ताब्यात घेतली. सामान तेथे ठेविले, व आम्ही देव दर्शनास निघालो. अंजनेय मंदिर, धुनी, बाबांचे निद्रास्थान, त्यांचे जूते, कपडे, बाग, स्नानाची जागा, बहिर्दिशेस जाण्याचा मार्ग, नदी सारे पाहून झाले रात्रीची आरती झाली. समाधीस फुलांची शाल घातली नि आम्ही निवासस्थानी परतलो.

खोलीत एकच कॉट होती झोपणाऱ्या व्यक्ती तीन. पैकी दोन पुरुष होते. स्त्रीदाक्षिण्य म्हणा हवे तर मी कॉटवर व दोघांनी खाली अशी योजना झाली. त्या दोघांना झटपट निद्रादेवी प्रसन्न झाली. निसूर निद्रेचे घोरणेही ऐकू येऊ लागले. मला मात्र झोप येईचना. एक तर जागा बदललेली. दुसरे बाबांसंबंधी विचार चक्र सुरू झाले.

इतक्यात दारास धक्का बसला. मी जरा भ्यालेच, पण दार उघडून आत विशालकाय, तेजःपुंज व्यक्ती माझ्या कॉटजवळ येऊन उभी राहिली. नाक, डोळे तरतरीत, भव्य भाल प्रदेश, मजबूत शरीर बांधा. बदामीसारखाच जवळ जवळ रंग असलेला मैलसर अंगात सदरा. लुंगी नेसलेली अशी ती व्यक्ती होती. त्या व्यक्तीस पाहून मी अधिकच भ्याले. इतक्यात त्या व्यक्तीने मला हलवले व म्हटले, 'तुम क्या सोने के लिये आई हो?' चलो मेरे साथ मैं तुम्हे बाबाका सबकुछ दिखा देता हूं, फिर बाबाका दर्शनभी कराता हूं ! चलो!'

मी काहीही विचार केला नाही. हिपनाइट झाल्याप्रमाणे त्या पूज्य विभूतीच्या मागोमाग जाऊ लागले. जिना उतरलो कारण खोली वरचीच होती त्या व्यक्तीबरोबर चालतांना एक सुंदर सुगंध मला येत होता. ते माझ्याशी हिंदी बोलत होते. एकेक स्थान मनापासून दाखवत होते. माहिती सांगत होते मी ऐकत होते व ठिकठिकाणी नमस्कार करीत होते. सर्व परिसर पाहून झाल नि त्यांनी मला पूर्वस्थानी आणून सोडले. मला वर्णनातीत आनंद झाला. दा

बंद करून मी अंथरूणावर पडले. पुन: दारास धक्का बसला. दार उघडले गेले. आणि स्वामीनारायण पुन: माझ्या जवळ आले नि पूर्वी प्रमाणेच म्हणाले, 'उठो, जल्दी उठो. तुम सोनेके लिए नहीं आई हो. चलो मेरे साथ चलो!' आणि मी गेले हा प्रकार त्या रात्री तीनवेळा घडला तिसऱ्या खेपेस मी त्यांच्या (स्वामींच्या) पायावर माझे डोके ठेविले, व वर पाहिले तर ते स्वामी मला म्हणाले, 'पहचान लिया मैं कौन हूं? जिसके दर्शनके लिए तुम तरस रही हो वही मैं बाबा हूं! अच्छा सोओ । फिर जल्दी वापस आना!' इतके बोलून झाल्यावर मात्र बाबा तेथेच अदृश्य झाले, आणि मी ईश्वर चिंतनात मग्न होण्याचा प्रयत्न करू लागले. त्यावेळेस अवघे तीन वाजले होते.

मला वाटे पुन: बाबा येतील आणि रागावतील. म्हणून मी मग झोपलेच नाहीं.

★

## प्रगट आभार

आमच्या धर्मपत्नी सौ. ताराबाई यांचे शुक्रवार दिनांक ७–१०–१९८३ रोजी पहाटे आकस्मिक निधन झाले हे वृत्त कळल्याने आमच्या असंख्य साईभक्त स्नेही मित्रांनी, आप्तनातलगांनी व चहाते–हितचिंतकानी आम्हांस प्रत्यक्ष भेटून आमचे सांत्वन केले तसेच दूरदूर ठिकाणच्या अगणित साई-भक्तांनी आमच्यावर कोसळलेल्या आपत्तीत सहभागी होऊन शोक–सांत्वनपर पत्रे पाठविली व आम्हांस धीर दिला. त्या सर्वच पत्रांना आभार प्रदर्शनाची उत्तरे पाठविणे केवळ अशक्य आहे म्हणूनच या निवेदनाद्वारे त्या सर्वांचे आभार मानीत आहोत.

**सदानंद चेंदवणकर.**
का. संपादक, श्रीसाईलीला

# मशीदमाई—द्वारकामाई—मुरलीधर मंदिर

श्री. पु. कृ. धुपकर
२१७।६ जवाहर नगर,
गोरेगाव, मुंबई ४०००६२.

० श्रीसाईबाबांनी शिर्डी येथे कायम राहावे अशी सबंध गावाची इच्छा होती. त्या इच्छेस अनुसरूनच जणु बाबा वागत आहेत असा भास होऊ लागला. श्रीबाबा मनात येईल तेथे बसत. कधी मारुतीचे देवळात तर कधी शनीच्या पारावर बसत. लहर लागल्यास ते लेंडी बागेतही थांबत. कित्येकवेळा ते शिर्डी-च्या जंगलातही भटकत. जणु ते योग्य स्थळाची निवड करीत आहेत असा त्यांच्या एकंदरीत हालचालीवरून भास होत असे. ह्या सुमारास शिर्डीकर मंडळींचा श्रीबाबांशी निकट सहवास घडू लागला. श्रीबाबांना मुख्या तंबाखुची चिलिम भरून देणे, त्यांनी परत केल्यास ती ओढणे वगैरे प्रकार जास्त प्रमाणात होऊ लागले. श्रीबाबा हे कोणाशीही जास्त बोलत नसत. विचारलेल्या प्रश्नांची मोजक्याच शब्दात उत्तरे देत. श्रीबाबा कोणाच्याही प्रेमात अगर लोभात अखेरपर्यंत सापडले नाहीत. श्रीबाबा केव्हा कोठे निघून जातील ह्याचा नेम नाही अशी काळजी सर्वांस वाटू लागली. कै. सौ. बायजाबाई ह्यांनी एके दिवशी अतिशय कळकळीचा आग्रह केला की आपण आमचे गावी मठ वगैरे बांधून कायम वस्ती करावी. ह्यावर श्रीबाबांनी स्पष्ट शब्दात सांगितले की "मनास येईल तेथे राहावे व इच्छेस येईल तिकडे जावे; कारण परमेश्वर सर्व ठिकाणी आहे".

श्रीबाबा ठराविक पाच घरीच भिक्षा मागत. त्यांच्या ह्या नियमात कधीही बदल झाला नाही. त्यांच्या भिक्षेचा रस्ता वेशीच्या डाव्या बाजूस होता. एक दिवस तो रस्ता सोडून ते उजव्या बाजुच्या रस्त्याकडे वळले व वेशी जवळच्याच एका पडक्या जागेत येऊन उभे राहिले. ह्या गोष्टीचे नवल वाटू गावकरी तेथे गोळा झाले. मनाची पूर्ण खात्री करून घेण्यासाठी तीन चा मिनिटे त्या स्थानाची बारकाईने पाहणी करीत तेथे थांबले. विचारमग्न होऊ मग एकदम म्हणाले "आपण येथेच राहणार!" गावकरी मंडळी म्हणाले ही मशिदीची जागा आहे. ह्यावर श्रीबाबांनी सांगितले की ईश्वर सर्व जा

आहे. नंतर ठराविक घरची भिक्षा मागून आणून श्रीबाबांनी त्या जागेवर जाऊन दुपारचे भोजन केले.

श्रीसाईबाबांनी ज्या ठिकाणी कायमची वस्ती केली ते ठिकाण त्या वेळेस अगदी मोडकळीस आले होते. भितींनी आपले मूळरूप सोडले होते. तेथील माती विटा दगड मन मानेल तशी पडली होती. लाकडी बांधकाम कसेतरी जीव धरून होते. कित्येक वर्षे त्या स्थानाकडे कोणाचेच लक्ष नव्हते, जाणून बुजून त्या जागेची उपेक्षा केली गेली असावी असे वाटते.

त्याकाळी गावात जी चारपाच मुसलमानांची घरे होती ती ह्या ठिकाणाहून बरीच लांब होती. गावातील मंडळींनी मोठ्या आनंदाने धावपळ करून त्या जागेची साफसफाई केली व श्रीबाबांस बसण्यास योग्य अशी जागा तयार केली. त्याच दिवशी श्रीबाबांनी घंटा मागविली व ती या स्थानात बांधली. आपल्या देहातील वैराग्याग्नीची सततची साक्ष म्हणून अक्षय जागृत अशी धुनी यांचे समोरच पेटविली. ही तर प्रत्यक्ष "द्वारकामाईच आहे" असे त्यांनी जमलेल्या गावकऱ्यांस सांगितले. श्री बाबांनी हे जे सहजोद्गार काढले याच्या पाठीशी काहीतरी धार्मिक इतिहास असलाच पाहिजे.

मुसलमानी सत्तेने आपल्या राजकीय आक्रमणाबरोबरच हिंदुच्या अनेक [धा]र्मिक स्थानांवरही बरेच आक्रमण केले आहे. हिंदु धर्मीयांचे सर्वश्रेष्ठ स्थान [म्हणजे] काशी, तेथील विश्वनाथाच्या मंदिराची त्यांनी मशीद बनवली आहे. हे [का]शीक्षेत्री आजही पाहावयास मिळत आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी नेवासे [गा]वी ज्या दगडी खांबाजवळ बसून ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला त्या पूज्य स्थानावर [आ]क्रमण करण्यासाठी मुसलमानांनी कोर्ट-कचेरीपर्यंत झगडे नेले आहेत. हा [इ]तिहास अगदी अलिकडचा ताजा असा आहे. महाराष्ट्रात सुप्रसिद्ध अशा अनेक [ना]थपंथीय सत्पुरुषांच्या समाधि आहेत, त्यावरही आक्रमण करून त्यांना पिराचे [स्व]रूप दिले गेले आहे. नगर व सोलापूर जिल्ह्यात अशी काही स्थाने आहेत [की] तेथे हिंदु व मुसलमान असे दोघेही आपला धार्मिक हक्क दाखवत आहेत. [शि]र्डी येथल्या द्वारकामाईच्या मागेही काही धार्मिक इतिहास असणे शक्य आहे. [श्री]साईबाबा सारखा आत्मानुभवी सत्पुरुष आपले सर्व अवतार कार्य तेथे करतो [व] अखेर देह विसर्जनही तसेच करतो, ह्यामागे तसलेच काही कारण असणे [श]क्य आहे काय? नगरच्या निजामशाहीच्या काळापूर्वी ह्या ठिकाणी कोणी

थोर तपस्वी होऊन गेला असावा व तेथेच श्रीकृष्णाचे मंदिर असावे असे वाटते. त्याच्या तपश्चर्येमुळे तत्कालीन हिंदुधर्मीय त्या स्थानास महत्व देत असावे व ही गोष्ट त्या काळच्या कोणा मुसलमान अधिकाऱ्यास सहन न होऊन त्याने त्या स्थानास मशिदीचे स्वरूप दिले असावे हे अगदी संभवनीय आहे. जी धार्मिक स्थळे एकदा भ्रष्ट केली गेली त्याकडे पुन्हा ढुंकूनही न पाहण्याची धर्मघातकी वृत्ती हिंदु लोकांत कशी आहे हे एकंदरीत गत इतिहासावरून स्पष्ट दिसून येते. हे सर्व आत्मज्ञानाने जाणूनच श्रीबाबांनी ते स्थान कायमचे ठिकाण म्हणून पसंत केले असावे. त्यापूर्वी होऊन गेलेल्या महात्म्याच्या पुण्य स्मरणार्थ त्यांनी तेथे घंटानाद सुरू केला. स्वतःच्या वैराग्यास सतत साक्षीभूत रहावी अशी ती अक्षय जागृत धुनी तेथे पेटविली. पक्षभेद, पंथभेद, जातिभेद, धर्मभेद श्री बाबांनी आपल्या अवतार कार्यात कोणत्याही भेदास नावापुरताही थारा दिला नाहीं. मनुष्य हीच जात! त्यांच्यासाठी झटणे हाच खरा धर्म. परोपकार हेच कर्तव्य. त्यांच्या ह्या कार्याचा प्रसार भारतातच काय पण साता-समुद्रा पलीकडेही जाऊन पोचला आहे.

★

श्रीसाईलीला

फेब्रुवारी १९८४

श्रीसाई काव्य–बहार विशेषांक

श्रीसाईलीला लेखक–कवी दहाव्या संमेलनप्रसंगी

शिरडी येथे प्रकाशित होणार

पृष्ठे ६४) (किंमत १ रुपया

# जीवनाची सार्थकता

**श्री. सूर्यकांत मा. गर्जे**
माउंट आबू

• सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ एपिक्टेटस म्हणतो – "या जीवनात काय अर्थ? सर्व काहीं शून्यवत आहे. आत्मा या निर्जीव शरीराचा भार वाहत असतो." आपण जर शांत चित्ताने अंतःमुख होऊन विचार केला तर वरील म्हणण्यात खूपच सत्यता असल्याचे आपणास पटते. तसे पाहिले तर जीवन क्षणभंगूर आहे. आळवा वरच्या पाण्यासारखे. केव्हां हे शरीर कोसळून पडेल याचा भरवसा नाहीं. या सर्व गोष्टीची जाणिव माणसाला नसते असे नाहीं. स्वतः घेतलेल्या अनुभवावरुन किंवा आपल्या सानिध्यात आलेल्या इतर लोकांच्या जीवनाचे अवलोकन केले असता जीवनाची गूढता आपणास समजते. जीवनाचा अर्थ आपणास उमगतो. दुःखाची आणि खेदाची गोष्ट म्हणजे सर्व काहीं समजून–उमजून देखील मनुष्य कधीकधी विपरीत वागतो. स्मशान भूमीवर गेलेला प्रत्येक माणूस समोरच्या धगधगत्या चितेकडे पाहून मनात हेच म्हणत असतो "एक दिवस आपणहि असेच जाणार. सर्व काहीं व्यर्थ आहे. खोटं आहे. निव्वळ मायाजाळ!" असा मनाचा आक्रोश चालू असतो परंतु स्मशानभूमीतून बाहेर पडताच काही क्षणातच तो हे सर्व काही विसरतो. मनाचं वैराग्य क्षणात गळून पडतं. आणि मन क्षणैक सुखाच्या मृगजळामागे भरकटत सुटतं.

स्थिर बुद्धीने, निर्विकल्प मनाने जीवनाचा विचार केला, जीवनाचा अभ्यास केला तर जीवन अर्थपूर्ण होऊ शकते. जीवन सुखेनैव जगता येते. भौतिक सुखाच्या मागे लागल्या मुळेच कदाचित एपिक्टेटसला जीवन निरर्थक आणि शून्यवत वाटू लागले असावे. भौतिक सुखे क्षणैक असतात, अल्पजीवी असतात. पारमार्थिक सुखे शाश्वत असतात, चिरकालीन असतात. ईश्वराच्या ठायी प्रेम निर्माण झाले, उपासना आणि भक्ति यांच्या द्वारे परमेश्वराच्या प्रति निष्ठा दृढ झाली तर मग जीवनातला अंधःकार दूर व्हायला कितीसा अवधि लागणार!

श्री साईनाथ महाराज हे एक जागृत दैवत आहे. मनोभावे, श्रद्धापूर्वक श्री बाबांची आराधना केली तर जीवनात कशाचे उणे? अनेक भक्तांना याची

प्रचिती आली आहे. आणि आजही येत आहे. श्रीबाबांच्या पदस्पर्शाने आणि पवित्र वास्तव्याने शिर्डी हे एक छोटेसे गाव तीर्थक्षेत्र बनले. आज आपण पाहतो सर्व धर्मीय लोक देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने शिर्डीला श्री बाबांच्या दर्शनासाठी येतात. पुनः पुन्हा येतात. याचाच अर्थ श्री बाबांच्या केवळ दर्शनाने देखील भक्तांना मनःशांती लाभते. आत्मिक सुखाची प्रचीति येते. श्री बाबांच्या दर्शनात एव्हढे सामर्थ्य आहे तर मग श्री बाबांचे मनन–चिंतन–भजन–पुजन, त्यांच्या शिकवणूकीचे आचरण व अध्ययन केले तर शाश्वत, चिरंतन सुखाच्या सागरात माणसाचे जीवन डुंबत राहील. प्रीती–सुख–शांति आणि आनंद यांची सुमधुर फळे चाखता येतील. मग जीवनाचे सोने झाले असेच वाटेल. जीवन अर्थपूर्ण करावयाचे असेल तर मनाची शुद्धता आणि अध्यात्म प्रीति नितांत आवश्यक आहे. अन्यथा एपिक्टेटस प्रमाणे नैराश्यवादी विचार मनांत थैमान घालतील.

---

## प. पू. श्री मोहितेबाबा साईचरणी विलीन



० वरळी जांबोरी मैदान येथील श्री साईनाथ मंदिर (ट्रस्ट) चे संस्थापक व वयोवृद्ध साईभक्त प. पू. श्री. मोहितेबाबा यांचे ३० नोव्हेंबर ८३ रोजी सकाळी अकस्मात देहावसान झाले. सकाळची श्रीबाबांची आरती त्यांनी केली त्यावेळी ते व्यवस्थित होते पण त्यानंतर त्यांना कसेसेच वाटू लागले व अवघ्या काही मिनिटातच त्यांची प्राणज्योत मालवली गेली. वरळीच्या मंदिराची स्थापना त्यांनीच केली होती व संपूर्ण देखभाल पण तेच पाहात होते. अलीकडेच त्यांनी आपल्या मंदिराची एक विश्वस्त समितीपण केली होती. त्यांच्या अंत्ययात्रेस शेकडो भक्त उपस्थित होते.

# संतरत्न भालचंद्र महाराज

**श्री. गौरूराम गोविंद उरणकर**
मु. पो. पनवेल, ता. पनवेल,
जिल्हा — रायगड, ४१० २०६.

० अध्यात्मिक जीवनात अनेक संतरत्ने अवतरली आहेत. ब्रम्हा, विष्णू, आणि महेश या तीन्ही देवतांचे रुप म्हणजे श्री दत्तगुरु. या दत्तगुरुने निर-निराळ्या रूपात सोळा अवतार घेतले. अशा या दत्तात्रेयासमोर उभे राहिले असतां धेनू, श्वान, औदुंबर वृक्ष, रुद्राक्षांची माळ, डमरू, त्रिशूळ, सुदर्शन चक्र आणि जलपूर्ण कमंडलू आपल्या नजरेसमोर येतात.

पृथ्वीचे प्रतीक म्हणून धेनू, चार वेदांचे प्रतीक म्हणून चार श्वान, शितल-तेचे प्रतीक म्हणून औदुंबरवृक्ष, बावन अक्षर बीजमंत्राचे प्रतीक म्हणून रूद्राक्षाची माळ, धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषांचे प्रतीक त्रिशूळ, वेदशास्त्रावरील प्रभूत्व म्हणून डमरू, अरिष्ट नाशाचे प्रतीक म्हणून सुदर्शन चक्र आणि संसार-स्थितित कारण होणाऱ्या कर्माचे (पाप पुण्याचे) प्रतीक म्हणून जलपूर्ण कमंडलू. असे हे प्रतीक दर्शविणारा हा दत्तगुरू भक्तांना व जीवजीवाणूंना सर्वस्व देणारा नित्य शुद्ध निराभास निराकार निरांजन नित्यबोध चिंदानंदम् सर्वधी साक्षी भूतम चराचर व्यापून तो अखिल भू मंडलात सामावून राहिलेला आहे.

अशा या दत्तगुरुच्या रूपात श्री साईबाबा, गजानन महाराज, अक्कलकोट स्वामी, माणिकप्रभू वगैरे संतरत्ने या भारत भूमिवर अवतरली. तसेच रत्ना-गिरी जिल्ह्यांत ब्रम्ह चैतन्याचा संतरत्न भालचंद्र महाराज देखील याच भूमीवर दत्तगुरुच्या रूपात अवतरले आणि दत्ताच्या रूपात आपल्या भक्तांना प्रत्यक्ष दर्शन देऊन यांचे संरक्षण करून मातापित्या प्रमाणे त्यांचे पालन पोषण करीत होते.

अध्यात्मिक जीवनातील सर्वश्रेष्ठत्व प्राप्त करून घेणारा हा महापुरुष यांची आज या भूमंडलांत असलेल्या संतमालिकेत संतरत्न म्हणून गणना होऊन ते या अध्यात्मिक जीवनाच्या इतिहासात अजरामर झाले आहेत. तसेच या अध्यात्मिक जीवनाच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णजडित अक्षरांनी लिहावे असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती होणार नाहीं.

भालचंद्र महाराज सर्वश्रेष्ठत्व प्राप्त झालेली अशी श्री समर्थ दिव्य विभूती होती. त्यांचे अध्यात्मिकाच्या अभ्यासाचे कार्य प्रचंड आणि महासागराच्या स्वरूपासारखे होते याची आपल्याला जाणीव झाल्याशिवाय रहात नाही यात मुळीच शंका नाहीं.

श्रीकृष्ण भगवंताने गीतेमध्ये लिहिल्याप्रमाणे व सांगितल्या प्रमाणे त्या मधील सर्वच योग प्रत्यक्ष महाराजा भालचंद्रांनी आचरणात व कृतीत आणून ते जणू काय त्यांच्याच आश्रयाला रहात होते. योग ही कल्पना नसून ती आचरणांत कशी आणावी याचा मूर्तीमंत आदर्श या श्री समर्थांनी आपल्या आध्यात्मिक साधनेने आपल्या असंख्य भक्तांना दाखवून दिला आहे.

आध्यात्मिक साधना ही केवळ अनुभव नसून या साधनेच्या अभ्यासाने अंतर्यामी हृदयातून उठणाऱ्या शुद्ध पवित्र आनंदाच्या लहरीचा स्वानंद भोगण्याची कला असून त्या स्वानंदाच्या लहरीचा आनंद चिरकाळ टिकणारा आहे. आणि त्या आध्यात्मिक सत्संग मार्गाने प्राप्त करून घेता येते याची सात्विकता या महाराजांनी त्यांच्या सान्निध्यात रहाणाऱ्या भक्तांना पटवून दिली आहे, आणि ती त्यांना पटलेली आहे.

अध्यात्मिक साधना आणि सत्संग मार्ग यांची गोडी अमृताहून अधिक गोड आहे असे महाराज कधीही कुणाला सांगत नसत परंतु अमृत गोड की अध्यात्मिक साधनेने सत्संग मार्गाला जाणे त्याहूनि गोड यांची अनुभूती स्वतः चाखावी, आणि स्वतः याचा उपभोग घेणे यात सद्गुरुचे सामर्थ्य कसले हे महाराज सांगत असत.

ज्याची तुलना करता येणार नाही असे महाराज भालचंद्राचे वैराग्य आत्मज्ञानाच्या भावनेवर आरूढ झाले होते. परमार्थिक जीवनाशी एकरूप होऊन राहिलेली ही समर्थ दिव्य विभूती आपल्या संपूर्ण आयुष्यात कधीही आपल्या मार्गापासून क्षणमात्र ही ढळली नसून आपण करून अकर्ता या भूमिकेने कार्य करीत राहिली. अशा या दिव्य विभूतीकडे पाहिले की आपल्या मनातील अहंकार वृत्तींचा नाश होऊन आपण सद्गुरुच्या सान्निध्यात असून आपण शुद्ध पवित्र आनंदाच्या लहरीचा स्वानंद चाखीत आहोत याची आपल्याला मनोमनी जाणीव होते.

अशा या त्रिगुणात्मक अखिल मंडळाकार सामावलेल्या दिव्य विभूती संतरत्न भालचंद्र महाराजांची पुण्यतिथी मार्गशीर्ष ७ शके १९०५ रविवार दि. ११–१२–८३ रोजी महाराष्ट्र भूमीवर ठिकठिकाणी त्यांच्या असंख्य भक्तांनी साजरी केली त्या या दिव्य विभूती भालचंद्र महाराज यांस माझे कोटी! कोटी! प्रणाम!

# नव वर्षाचे स्वागत

(१९८४ या नूतन वर्षाकरिता साईभक्तांना "शुभ-संदेश")

सौख्याचा दिन आला
आला । सौख्याचा दिन आला ।
साईच्या किर्ती सुमनांचा
सुगंध भुवनी दरवळला ॥धृ.॥

शिरडीचा परिसर सारा
तेजोमय जाहला ।
साई कृपेच्या कस्तुरीचा
सुवास गगनी पसरला ॥१॥

साईच्या पदस्पर्शाने सारा
परिसर पावन झाला ।
भक्तजनांच्या आनंदाला
पारावार न उरला ॥२॥

गोदाईचा तीर प्रसवला
दीनानाथ हा साई लाभला ।
कलीयुगी या जगा तारण्या
भुवर साई प्रभु अवतरला ॥३॥

हिंदु यवना देऊनि शिकवण
जातीयवाद नष्टची केला ।
बंधुत्वाचा मार्ग दाखवुनि
किर्ती ध्वज समतेचा रोविला ॥४॥

भाव भोळया भक्ती प्रसादा
साई सदा असे भुकेला ।
श्रद्धा-सबुरी तारक मंत्रा
देऊनि जीवन मार्ग दाविला ॥५॥

ऋद्धी-सिद्धी तव लोळण घेती
साई चरणी सकला ।

अद्भुत लीला दावुनी जनाला
राव रंक आपुलासा केला ॥६॥
"चंद्रकांत" म्हणे तुझी अगम्य लीला
काय वर्णु पामर मी तयाला ।
नव वर्षाचा शुभ-संदेश तव
कृपा दायी हावो सकला ॥७॥

श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे.
३९९, गुरुवार पेठ,
सातारा - ४१५ ००२.

## दासगणूंचे साईनाथ

जय जयाजी महाराज, जय जय गुरु बाबा साई
परब्रम्ह अवतार, तूं या शतकाचे ठायी ॥१॥
साई साई वदता वाचे, अघ अवघे विलया
जाई ऐसा प्रभाव तव कीं हे सद्गुरुराया
नाहीं शक्ती मजला, किमपी तव गुण वानाया
भाव धरूनि मात्र आलो शरणी तुझ पाया ॥२॥
हीन दीन मी पातकी मोठा, तसाच अज्ञानी
म्हणूनी समर्था देई न मजला कदापि लोटोनी
अधि भौतिक अध्यात्मिक तैसी अधिदैविक जाणी
दुःख संकट वारी समर्था कृपा कटाक्षानी ॥३॥
शुक्राचार्य तू होवोनी मागे भागवत कथियेले
नामामृत ते कबीर होवोनी जगता पाजियले
शिर्डीत येऊनी भ्रम निरसाया तैल जला केले
द्वय-अंगुष्ठी गंगा यमुना तीर्था दाखविले ॥४॥
भावे चरणी तव नत होता अघटित ते घडते
गाठी असल्या दुष्कृततेची सुकृत क्षणी होते
सूर्या गमने जसे निशेला दिवस रूप येते
दासगणू हा सदैव घाली तुम्हांस दंडवत ते ॥५॥

सौ. सरोजिनी मुळचे,
इंदूर

# साई कृपाळू

साई तुमचे रूप मनोहर
बाबा तुमची कृपा निरंतर
भक्त एकदा आला क्षणभर
कृपा तयावरी करीता सत्वर ॥१॥

बाबा तुमचे नयन मनोहर
नयनाची त्या नजर मनोहर
कृपा दृष्टी तव झाली भक्तपर
भाग्य उजळते क्षणी गगनभर ॥२॥

बाबा तुमचे विचार भारी
भक्त जनांचे कल्याणकारी
विचारातूनी बोधच घेता
भक्त होतसे झडकरी मोठा ॥३॥

बाबा तुमची कृपा असावी
सकल जनाना महामौलवी
कृपेतून त्या सबकुछ मिळते
जगता माझी असते नसते ॥४॥

श्री. शांताराम त्रिद
२६ नव योजना सदन ताडदेव मुं. ३४

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२–०० | ६–०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३–५० | ४–०० |
| ३) | ,, | हिंदी | १२–०० | ४–०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२–०० | ४–०० |
| ५) | ,, | कन्नड | १०–०० | ४–०० |
| ६) | ,, | तेलगू | १३–०० | ४–०० |
| ७) | ,, | तामीळ | १२–०० | ४–६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७–५० | ३–०० |
| ९) | ,, | हिंदी | ७–०० | ३–५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४–२५ | ३–०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४–०० | ३–०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०–३५ | ३–०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०–३० | ३–०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०–५० | ३–०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०–५० | ३–०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १–२५ | ३–०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५–०० | ३–०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०–७५ | ३–०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४–०० | ३–०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४–५० | ३–०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १–७५ | ३–०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १–७५ | ३–०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १–५० | ३–०० |
| २६) | ,, | हिंदी | १–७५ | ३–०० |

**Regd. No. MH/BYE/26**
**LICENCE No. 19**
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–९० | ३–०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठि व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०–०० प्रत्येकी प्रत १–००
(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १–६५ | ३–०० |
| २) | ,, | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०–२० | ३–०० |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–०० |

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व **प्रकाशक : श्री. क. हि. काकरे**, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई १४.